दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री

## कोपर्डी पीडितेच्या बहिणीच्या लग्नात मुख्यमंत्र्यांची हजेरी

**शिरूर :** कोपर्डी आत्याचार प्रकरणातील पीडित मुलीच्या बहिणीचा विवाह सोहळा आज पार पडला यास मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहत वधू-वरांना आशीर्वाद दिले.सुमारे आठ वर्षांपूर्वी कोपर्डी येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील तिन्ही आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी महाराष्ट्रभर अनेक मोर्चे आणि आंदोलने झाली.आज पीडित मुलीच्या बहिणीचे लग्न होते. या लग्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. सुद्रिक कुटुंबातील मुलीचा विवाह निघोज (ता. पारनेर) येथील वराळ कुटुंबातील मुलाशी झाला. शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे हा विवाह सोहळा पार पडला. कोपर्डीतील पीडितेच्या वडिलांचा फडणवीस यांच्याशी घटनेपासून कायम संपर्क राहिला आहे. त्यांनी आपल्या धाकट्या मुलीच्या लग्नाचे निमंत्रण फडणवीस यांना पूर्वीच दिले होते.फडणवीस यांनी लग्नाला यायचंही कबूल केले होते आणि त्यांनी लग्नाला येण्याचे वचन पाळले.

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक ६० ● सोमवार, ०९ डिसेंबर २०२४ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## काय म्हणता..!

धर्मेंद्र व्यास




## झापुक । zupuk

खडखड धडधड
करीत चाले बस
आदळून, आपटून खिळखळे
होऊन निघे हाडांचा कस
तंबाखू, गुटख्याच्या पिचकाऱ्याने
रंगलेले असतात कोपरे
ते पाहूनउलटी,मळमळीच्या
भीतीने भरते कापरे
बिचारी अहोरात्र देते
प्रवाशांना सेवा
तिच्या सेवेचे भान विसरून
तिच्याकडूनच खातात मेवा
डबा म्हनून तिला
हिणवतात नाहक
आपली समजून काळजी
तरी घेतात चालक वाहक

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

# विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर बिनविरोध!

## एकमेव अर्ज; आज होणार औपचारिक घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** भाजपचे आमदार राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निश्चित मानली जात आहे. महाविकास आघाडीकडून कोणीही उमेदवारी अर्ज भरला नाही. त्यामुळं दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत होती. उद्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पडणार आहे. एकमेव अर्ज असल्याने राहूल नार्वेकरांच्या नावाची उद्या घोषणा होणार आहे.

राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभा अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, विरोधी पक्षांकडूम एकही उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळं राहुल नार्वेकरांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवड होणार हे निश्चित मानले जात आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत ही रविवारी दुपारी १२ वाजेपर्यंत होती. या मुदतीत मविआकडून एकही उमेदवारी अर्ज आला नाही. त्यामुळं नार्वेकरांची बिनविरोध निवड होणार आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं आहे. या निवडणुकीत भाजपला १३२, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला.



मित्रपक्षांसह महायुतीचं संख्याबळ २३६ इतकं झालं आहे. महायुतीकडे मोठं संख्याबळ असल्यानं विधानसभा अध्यक्ष तीन पक्षांमध्ये कुणाकडे जाणार याबाबत देखील चर्चा सुरु झाल्या होत्या. मात्र, विधानसभा अध्यक्षपद पुन्हा एकदा भाजपकडे जाणार आहे. भाजपकडून विधानसभा अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांना पुन्हा संधी मिळणार हे निश्चित झालं आहे.

महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले आणि त्यानंतर भाजपबरोबर जात सरकार स्थापन केले. यानंतर विधानसभा अध्यक्षपद हे भाजपनं त्यांच्याकडे घेतलं होतं. यावेळी भाजपनं आमदार राहुल नार्वेकर यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांच्याकडे विधानसभेचं अध्यक्षपद जाणार आहे. फक्त नावाचा घोषणा होणच बाकी आहे. आज उमेदवारी अर्ज भरण्याची दुपारी १२ वाजेपर्यंत मुदत होती. या काळात महाविकास आघाडीकडून एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. त्यामुळं राहुल नार्वेकर हे बिनविरोध अध्यक्ष होणार आहेत. नार्वेकर हे दुसऱ्यांदाविधानसभा अध्यक्ष होणार आहेत. दरम्यान, राहुल नार्वेकर हे कुलाबा विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून निवडून आले आहे. नार्वेकर सलग दुसऱ्यांदा या मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

### महाविकास आघाडीला हवंय विरोधी पक्षनेतेपदासह विधानसभेचे उपाध्यक्षपद

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज बैठक घेऊन विधानसभा अध्यक्ष पदाचा अर्ज न भरण्याबाबत निर्णय घेतला. त्या बदल्यात आम्ही विरोधी पक्षनेते पद आणि विधानसभा उपाध्यक्ष पद आम्हाला मिळावं, यासाठी मुख्यमंत्र्यांसमोर प्रस्ताव ठेवला. नाना पटोले, भास्कर जाधव, अस्लम शेख आणि विजय वडेट्टीवार यांनी आज मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यांची भेट घेतली. दरम्यान, १९९९ पासूनची परंपरा होती की सत्ताधाऱ्यांकडे विधानसभा अध्यक्षपद तर विरोधकांकडे विधानसभेचे उपाध्यक्ष पद असावं. भाजप आणि शिवसेनेच्या काही चुकांमुळे ही परंपरा खंडित झाली होती. त्यामुळे ही परंपरा पुन्हा सुरू करावी आणि उपाध्यक्ष पद मिळावं अशी विनंती आम्ही मुख्यमंत्र्यांसमोर केली असल्याची माहिती शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी दिली आहे.

# १०३ शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाकडून नोटिसा / शेतकऱ्यांच्या ३०० एकर जमिनीवर दावा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** लातूर जिल्ह्यातील तळेगावातील ७५ टक्के जमिनीवर वक्फ बोर्डने दावा केला आहे. गावातील १०३ शेतकऱ्यांचा ३०० एकर जमिनीचा यात समावेश आहे. जमिनी परत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाने नोटीस पाठवल्या आहेत.

इस्लामिक कायद्यानुसार वक्फ बोर्डाच्या मालमत्तेचा वापर केवळ धार्मिक आणि धर्मादाय कामांसाठी केला जाऊ शकतो. त्यापैकी लातूरच्या १०३ शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाने नोटीस पाठवली आहे. या जमिनीच्या वादात सरकारने हस्तक्षेप करावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. सध्या हे प्रकरण छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरणाकडे सुनावणीसाठी गेले आहे. या प्रकरणामुळे तळेगाव, अहमदपूर, लातूर येथील शेतकरी सध्या चिंतेत आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुकीनंतर महायुती सरकार पुन्हा एकदा सत्तेत आले आहे. यावेळी माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (पान ४ वर)

### राज्य वक्फ बोर्डाचा संबंध नाही...

तळेगाव येथील शेतकऱ्यांना पाठविलेल्या नोटिसा एका व्यक्तीने वक्फ ट्रिबुनल कोर्टात दावा दाखल केल्यानंतर कोर्टाने काढल्या आहेत. त्या नोटीसा वक्फ बोर्डाकडून गेलेल्या नाहीत. आम्ही लातूर जिल्ह्यातील कुठल्याही गावच्या जमीनीवर दावा केलेला नाही.

**– समीर काजी, अध्यक्ष, वक्फ बोर्ड, महाराष्ट्र राज्य.**

### जमिनी परत कराव्या लागतील...

वक्फ बोर्डाने नोटीस पाठवली असेल तर हे काम ट्रिब्युनल कोर्टाचे आहे. शेतकरी जर जमीन त्यांची आहे असा दावा करत असतील तर आणि त्यांच्याकडे पुरावे, कागदपत्रे असतील तर वक्फ बोर्डाने १०० नोटीस पाठवल्या तरी काय फरक पडणार आहे.
पण जर ती जागा वक्फ बोर्डाची आहे आणि शेतकरी तिथे शेती करत असतील तर वक्फ बोर्डाला जमीन परत घेण्यासाठी अधिकार आहे. याच्यात कोणती चुकीची गोष्ट नाही.

**– मुफ्ती इस्माईल कासमी आमदार, एमआयएम मालेगाव**

### तीन पिढ्यांपासून जमीन कसतो...

माझी पाच एकर जमीन आहे. आमच्या तीन पिढ्यांपासून आम्ही ही जमीन कसतो. आमच्याकडे खासरा पानी नक्कल, सात-बारा आदी पुरावे आहेत. २० डिसेंबर रोजी औरंगाबाद वक्फ न्यायाधिकरणाकडे हे पुरावे वकिलांमार्फत सादर करणार आहोत. एकाचवेळी गावातील १०३ शेतकऱ्यांना नोटिसा आल्यामुळे शेतकरी घाबरले आहेत.

**तुकाराम कानवटे, शेतकरी, तळेगाव.**

### शासनाकडून शपथपत्र दाखल केले जाईल...

तळेगाव येथील १०३ शेतकऱ्यांच्या जवळपास ३०० एकर जमिन प्रकरणी शेतकऱ्यांना वक्फ न्यायाधीकरणाच्या नोटीसा आल्या आहेत. याची संपूर्ण माहिती घेऊन शासनातर्फे शपथपत्र दाखल करण्यात येणार आहे.

**–उज्वला पांगरकर तहसीलदार, अहमदपूर**

## महत्वाचे...

### बेळगावात महाराष्ट्रातील मंत्र्यांना बंदी

**मुंबई :** कर्नाटक सरकारचे हिवाळी अधिवेशन ९ डिसेंबरपासून बेळगाव इथे होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र एकीकरण समितीने महामेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाल्याला उपस्थित राहाण्यासाठी महाराष्ट्रातील प्रमुख पक्षाच्या नेत्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. मात्र नेत्यांना बेळगावत येण्यास बंदी घालण्यात आली आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांच्या समर्थनासाठी या मेळाव्याला यावं असं आवाहन एकीकरण समितीने केलं आहे. मात्र या महामेळाव्यावर कर्नाटकर सरकारने बंदी घातली आहे. त्यांना परवानगी नाकारण्यात आली आहे. शिवाय महाराष्ट्रातल्या नेत्यांना कर्नाटकात येण्यास बंदी केली आहे. जर तसे कृत्य केल्यास त्यांना ताब्यात घेवून परत पाठवले जाईल असा इशाराही देण्यात आला आहे. तर काही कन्नड संघटनांनी महाराष्ट्र एकीकरण समितीवर कारवाईची मागणी केली आहे.

### लग्नाच्या दुसऱ्या दिवशी दागिन्यासह नवरी पसार

**सातारा :** येथील एका युवकाकडून लग्न होण्यासाठी पैसे घेऊन लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी दागिन्यांसह नवरी पसार झाल्याने त्या युवकाने आपली फसवणूक झाल्याची तक्रार बोरगाव ता.सातारा) पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.
ही घटना वर्षभरापूर्वी घडली असून हा युवक वर्षभर नवरीला परत आणण्यासाठी प्रयत्न करत होता. मात्र, नवरी परत न आल्याने या युवकाने ७ डिसेंबर रोजी रात्री अखेरीस दागिने व रोख रक्कम अशी एकूण चार लाख ७० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार लग्न लावून देणाऱ्या चौघा जणांच्या टोळीविरोधात बोरगाव पोलिस ठाण्यात दिली आहे. बोरगाव पोलिसांनी या टोळीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.
वर्षा सुंदरसिंग ठाकूर (मु. पो. तळणी, ता. सिल्लोड), जान्हवी जयेश सोळंके (रा. सिडको स्कीम, खोतकरवाडा, संभाजीनगर), ताराचंद पुंडलिक आघाणी (रा. पेरणे, ता. हवेली, जि. पुणे) व श्रीकांत शिंदे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

# ताहाराबाद येथे बिबट्याचा मुलावर हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथे बिबट्याने रुद्र सचिन गागरे (वय ६) या मुलावर हल्ला केला. यामध्ये मुलगा जखमी झाला आहे. वडडिलांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने त्या ठिकाणा वरून धूम ठोकली. ताहाराबाद येथे बिबट्याचा वावर वाढला आहे. हा बिबट्या प्राण्यांवर हल्ला करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. रुद्र हा घरा बाहेर खेळत होता. ताहाराबाद येथील आठवडे बाजार असल्याने बडील बाजार आणण्यासाठी गेले होते. ते मोटारसायकलवरून परत आल्यावर मुलागा गाडीकडे धावत गेला असता त्या मुलावर बिबट्याने झेप घेतली. वडिलांनी सतर्कता दाखवत आरडोओरडा केला. त्यामुळे बिबट्याने त्या मुलाला त्या ठिकाणी टाकून धुम ठोकली. मुलगा वाचला पण जखमी जास्त झाला. त्याला ताहाराबाद येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या ऊसतोड सुरू असल्याने बिबटे बाहेर पडत आहेत. वन विभागाने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**बिबट्याची लपण्याची सर्व जागा मोकळी झाल्यामुळे बिबटे दिवसाही फिरत आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. तरी वन विभागाने ताबडतोब पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे.**

**– नारायण झावरे, मा. सरपंच, ताहाराबाद**

# पत्नी नांदायला येत नसल्याने पतीची गोदावरीत उडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर :** पत्नी नांदायला येत नसल्याने निराश झालेल्या तरुणाने संभाजीनगर - पुणे महामार्गावरील जुने कायगाव येथील गोदावरी नदीच्या पात्रात उडी घेऊन आत्महत्या केली. हा दुदैवी प्रकार शनिवारी ७ डिसेंबर रोजी समोर आला असून सुशील मुकिंदा तायडे (३५ रा. देवरी ता. अकोट जि. अकोला) असे मयत युवकाचे नाव आहे.

मृत सुशील वाळूजएमआयडीसी येथे एका कंपनीत कामाला होता. वर्षभरापूर्वी त्याचा विवाह झाला होता तो पत्नीसह वाळूज एमआयडीसी येथे राहत होता. मात्र लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यातच पत्नी माहेरी गेल्याने हल्ली तो वडगाव कोल्हाटी येथे बहिणीकडे राहत होता. अशी माहिती त्याचे मेहुणे अशोक सरकटे यांनी दिली. सुशील हा बुधवार दि. ४ डिसेंबर पासून बेपत्ता होता खूप शोधाशोध करूनही तो न सापडल्याने नातेवाईकांनी गुरुवार ५ डिसेंबर रोजी वाळूज एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे हरवल्याची तक्रार दाखल केली होती. शनिवारी ७ डिसेंबर रोजी गंगापुर पोलीसांना जुने कायगाव येथील गोदावरी नदीपात्रात अनोळखी प्रेत असल्याची माहिती मिळाली. गंगापुर पो. स्टे. चे पोउनि प्रमोद काळे व पो अंमलदार अनिरुद्ध शिंदे व दत्तात्रय गुंजाळ यांनी जाऊन प्रेत बाहेर काढून पंचनामा केला व रुग्णवाहिका चालक शुभम वाघमारे यांच्या मदतीने गंगापुर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या युवकाची माहिती काढली असता एमआयडीसी वाळूज पोलीस स्टेशनला त्याला हरवल्याची तक्रार दाखल असल्याची माहीती मिळाली. त्यावरून नातेवाईकांशी संपर्क साधून गंगापुर येथे बोलावले असता मयताचा चुलतभाऊ राहुल तायडे याने सदरील मृतदेह सुशील तायडे याचाच असल्याबाबत ओळख पटवली. शवविच्छेदन झाल्यानंतर अंत्यविधीसाठी मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# श्रीमंतांच्या यादीत मुंबई पहिल्या, पुणे दुसऱ्या क्रमांकावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत जिल्ह्यांच्या यादीत मुंबई पहिल्या स्थानावर आहे तर पुणे जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. औद्योगिक, कृषी आणि सेवा क्षेत्रामध्ये पुणे जिल्ह्याचे खूप मोठे योगदान आहे. तसेच पुणे जिल्हा मोठा खढ हब देखील आहे. या जिल्ह्यात ऋुझ ३ लाख ६८ हजार ४७८ कोटी रुपये इतका आहे.

महाराष्ट्र हे भारतातील भारतातील प्रमुख राज्यांपैकी एक आहे. कमाईच्या बाबतीतही महाराष्ट्र देशात अव्वल स्थानी आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेले मुंबई शहर हे महाराष्ट्राप्रमुखहिल्या नंबर वर आहे.

महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे आणि ३५८ तालुके आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा हा भौगोलिक, आर्थिक, धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या वेगळा आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा विभागात विभागणी करण्यात आली आहे. कोकणात मुंबई आणि ठाणे हे जिल्हे मोठे आहेत. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, उत्तर महाराष्ट्रात नाशिक, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर विदर्भात अमरावती आणि नागपूर असे सहा प्रशासकीय आहेत.महाराष्ट्रातील काही जिल्हे खूपच श्रीमंत आहेत. देशाच्या इकॉनॉमीला याचा फायदा होतो.

महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत जिल्ह्यांची यादी मध्ये मुंबई जिल्हा पहिल्या स्थानी आहे. मुंबई भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. मुंबईत बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, रिझर्व बँक ऑफ इंडिया यासारख्या प्रमुख वित्तीय संस्था तसेच फिल्मसिटी आहे. मुंबईचा एकूण ऋुझ १२ लाख कोटी रुपये आहे.



ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत जिल्ह्यांच्या यादी तिसऱ्या क्रमांकावर आहे. ठाणे जिल्हा हा मुंबई प्रमाणेच कोकण विभागात येतो. ठाणे एक मोठे उपनगर आणि महाराष्ट्रातील सर्वात वेगाने (पान ४ वर)

# राहुरीत शेतकरी दांपत्याने पिकवले 'लाल सोने'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील एका दाम्पत्याने राहत्या घरातील एका खोलीत काश्मीर येथील केशर शेतीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला आहे. नीलिमा चिंचकर व रामदास चिंचकर (रा.राहुरी, जि.अहिल्यानगर) असे प्रयोगशील दाम्पत्याचे नाव आहे. त्यांना केशर शेतीतून शाश्वत उत्पन्न मिळू लागल्याने एका नव्या प्रयोगाला उभारी मिळाली आहे.

मागील काही वर्षांपासून अनियंत्रित हवामान व बदलते वातावरण यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. हीच शेती जर नियंत्रित वातावरणात केली तर होणारे नुकसान टाळता येते, असा विचार करून चिंचकर दाम्पत्याने केशर शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी आवश्यक असणारे केशराचे कंद त्यांनी थेट काश्मीर येथून मागवले आहेत.



तंत्रज्ञानाचा वापर करून काश्मीरसारखे वातावरण त्यांनी राहत्या घराच्या एका बंद खोलीत तयार केले. आर्द्रता आणि नियंत्रित तापमान यांच्या आधारावर अगदी दोनच महिन्यात त्यांच्या केशराला फुले आली आहेत.

११ फूट बाय १५ फुटाच्या एका बंद खोलीत केशर पिकविण्याची किमया साध्य करून दाखवली आहे. त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला आहे.

किरकोळ बाजारात एक ग्रॅम केशरची किंमत ८०० ते १००० रुपये इतकी आहे. मागणी जास्त व उत्पादन कमी,यामुळे केशराला चांगला भाव मिळत आहे. काश्मीर येथील मोगरा केसर हे जगातील सर्वोत्तम केसर समजले जाते. भारताच्या केशराच्या मागणी पैकी फक्त आठ ते दहा टक्के मागणी आपण पूर्ण करू शकतो. बाकी केशर इराण व स्पेन या देशातून आयात केले जाते.

एरोपोनिक्स तंत्रज्ञानासाठी रूम बनवण्याचा खर्च हा एकदाच करावा लागतो. काश्मीरहून जे कंद मागवले जातात, त्या एका कंदाचे पुढच्या वर्षी चार कंद तयार होतात. असे दरवर्षी कंद वाढत जातात. कंद वाढले की उत्पन्नातही वाढ होते. कंदाला वर्षातून एकदा फुले येतात. त्या फुलांवर ते केशर येते. नंतर ते काढून एकत्रित केले जाते. उत्पन्न अत्यंत कमी निघाले, तरी त्यांची किंमत बाजारात जास्त असते. या केशरला 'लाल सोने' असे देखील संबोधले जाते. केशराच्या अधिक किंमतीमुळेच त्याचा 'लाल सोने' असा उल्लेख केला जातो. खाद्य पदार्थांसह केशराचा सौंदर्यप्रसाधने व औषधांमध्येही वापर केला जातो. भारतात केशरला भरपूर मागणी आहे. त्या तुलनेत उत्पादन खूप कमी आहे. त्यामुळे इराणसह अन्य देशांकडून ते आयात केले जाते. मागणी जास्त असली तरी उत्पादन मात्र कमी असते. कारण केशर पिकविण्याचे भारतातले एकमेव ठिकाण म्हणजे काश्मीर. परंतु, हवामान बदलामुळे वीस वर्षांत केशरच पीक ६० टक्क्यांनी कमी झाले आहे. केशराचे पीक हे काश्मीरमध्ये काही एरियामध्ये घेतले जाते. त्यासाठी योग्य तापमान आणि आर्द्रतेची आवश्यकता असते. वातावरणातील हवामान बदलामुळे आता काश्मीरमध्ये केशराचे उत्पादन कमी होत आहे. वातावरण नियंत्रित करून आपण कोणत्याही भागातले पीक भारताच्या कोणत्याही ठिकाणी घेऊ शकतो. केशर शेती हे त्यापैकीच एक. या तंत्रज्ञानाला एरोपोनिक्स तंत्रज्ञान असं म्हणतात. म्हणून आता केशर शेती ही फक्त काश्मीरपुरती मर्यादित राहिली नसून राहुरीत देखील या केशर शेतीचा यशस्वी प्रयोग सुरू झाला आहे.

## संपादकीय

# बांगलादेशी तस्करांचे आव्हान

नागालँड पोलिसांनी ५ डिसेंबर या दिवशी राज्यात पकडलेल्या ३४ कोटी रुपयांच्या अमली पदार्थांचा साठा नष्ट केला. नागालँडमध्ये ऑक्टोबर आणि आता चालू असलेल्या डिसेंबर या महिन्यांमध्ये केलेल्या ७९ कारवायांमध्ये हा साठा पकडण्यात आला आहे. अमली पदार्थविरोधी पथकाद्वारे पकडला जाणारा अशा प्रकारचा अमली पदार्थांचा साठा ठराविक कालावधीनंतर नष्ट करण्याची कार्यवाही ही प्रत्येक राज्यात केली जाते. उत्पादन शुल्क विभाग ज्याप्रमाणे कारवाईत पकडलेले मद्य नष्ट करते, त्याप्रमाणे अमली पदार्थविरोधी पथकाने जप्त केलेले अमली पदार्थ नष्ट केले जातात. अमली पदार्थविरोधी पथकाच्या नियमितच्या कारवाईतील हा एक भाग आहे. त्यामध्ये विशेष काय ? असे कुणाला वाटेल; परंतु यापूर्वीही जुलै ते सप्टेंबर या कालावधीत नागालँड पोलिसांनी ३० कोटी ५ लाख रुपयांचा अमली पदार्थांचा साठा नष्ट केला. अशा प्रकारे २-३ मासांनी जप्त केलेले अमली पदार्थ नष्ट केले जातात; परंतु जे अमली पदार्थ पकडले जात नाहीत, ते समाजात वितरित होतात आणि प्रतिमहिन्याला सापडणार्या कोट्यवधी रुपयांच्या अमली पदार्थांची आकडेवारी पहाता वितरित होणारे अमली पदार्थ अब्जावधी रुपयांच्या संख्येत असतील, ही राष्ट्रापुढील खरी समस्या आहे. हा विषय केवळ नागालँडपुरता मर्यादित नाही, तर ती संपूर्ण देशाची अत्यंत गंभीर समस्या आहे. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ या शेजारी देशांच्या सीमांतून अमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणात भारतात होते. मागील काही मासांमध्ये मुंबईमध्ये अमली पदार्थविरोधी कारवायांमध्ये पकडण्यात आलेल्या अमली पदार्थांच्या तस्करांमध्ये काही बांगलादेशी नागरिक आढळले आहेत. अमली पदार्थ आणण्यात बांगलादेशी नागरिकांचा सहभाग वाढत असल्याचे गेल्या काही मासांच्या आकडेवारीवरून दिसून येईल. यातील महत्त्वाचा भाग, म्हणजे अमली पदार्थांच्या तस्करीसाठी बांगलादेशी घुसखोरांना पद्धतशीरपणे भारतात प्रस्थापित केले जात आहे.

मागील आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या विशेष न्यायालयाने पुणे येथील धोबीघाट, भैरोबा नाला येथे अवैधरित्या रहाणार्या ३ बांगलादेशी घुसखोरांना अमली पदार्थांची तस्करी करून 'अल कायदा' या जिहादी संघटनेच्या 'अन्सारुल्ला बांगला' या आतंकवादी संघटनेला अर्थसाहाय्य केल्याप्रकरणी ५ वर्षांची शिक्षा ठोठावली. यात गंभीर, म्हणजे या बांगलादेशी घुसखोरांकडे 'पॅनकार्ड', 'आधार कार्ड', 'मतदान ओळखपत्र', 'शिधापत्रिका' ही भारतीय ओळखपत्रे मिळाली. राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेने ही माहिती न्यायालयात सादर केली. जे अपप्रकार पुणे येथे चालू आहेत, तेच मुंबईमध्येही चालू आहेत. बांगलादेशी सीमेला लागून असलेल्या बंगालमध्ये याविषयीची स्थिती काय असेल, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. बांगलादेशी घुसखोरांना भारतात प्रस्थापित करणे, हे काही एकट्यादुकट्याचे काम नाही. त्यांना भारतात प्रस्थापित करण्यासाठी मोठी यंत्रणा कार्यरत आहे, ही खरी देशापुढील गंभीर समस्या आहे आणि तिला अमली पदार्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अर्थसाहाय्य होत आहे. त्यामुळे अमली पदार्थांच्या माध्यमातून व्यसनाधीनता हे तर गंभीर सूत्र आहेच; परंतु या माध्यमातून चालू असलेले राष्ट्रविरोधी कारवायांचे षड्यंत्र ही आणखी मोठी गंभीर समस्या आहे. त्यामुळे याकडे मोठ्या गांभीर्याने पहाण्याची आवश्यकता आहे. काही वर्षांपूर्वी 'उडता पंजाब' नावाचा हिंदी चित्रपट प्रसारित झाला. त्यात अमली पदार्थांनी पोखरलेल्या पंजाबची विदारक स्थिती दाखवण्यात आली आहे. यातून पंजाबची अपकीर्ती झाल्याची टीका काहींनी केली; मात्र हे वास्तव आहे आणि याविषयी वेळीच कारवाई न झाल्यास भारतातील विविध राज्यांमध्ये अमली पदार्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात फोफावेल.

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात महाराष्ट्रात ६७३ कोटी २२ लाख रुपयांची अवैध मालमत्ता पकडण्यात आली. यामध्ये पैसे, मद्य, अन्य मूल्यवान वस्तू यांसह अमली पदार्थ यांचे मूल्य कोट्यवधी रुपयांमध्ये होते. याच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या; मात्र 'नियमितच्या कारवाया' म्हणून याविषयीची संवेदनशीलता न्यून होत आहे, ही वस्तूस्थिती आहे; परंतु वर्ष २०१९ मध्ये पार पडलेल्या लोकसभेच्या आणि महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पकडण्यात आलेल्या अमली पदार्थांची आकडेवारी पाहिली, तर वर्ष २०२४ च्या लोकसभा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात पकडण्यात आलेल्या अमली पदार्थांची रक्कम ही अब्जावधी रुपयांची आहे. या समाजविघातक कारवायांमागे देशविरोधी शक्तींचा सहभाग आहे.

काही वर्षांपूर्वी लाखो रुपयांचा घोटाळा, म्हणजे 'मोठा घोटाळा' समजला जात होता. वृत्तपत्रांमध्ये त्याची ठळकपणे वृत्ते यायची. सद्यःस्थितीत मात्र घोटाळ्यांची संख्या सहस्रो कोटींमध्ये असते. लाखो रुपयांच्या घोटाळ्याची वा भ्रष्टाचाराची वृत्तेही सध्या माध्यमांमध्ये यायची बंद होत आहेत. अशीच काहीशी असंवेदनशीलता अमली पदार्थांच्या तस्करीची झाली आहे. निवडणुकीच्या काळात नियमितपणे पकडल्या जाणार्या कोट्यवधी रुपयांच्या अमली पदार्थांच्या साठ्याविषयी समाजालाही सवय झाली आहे. कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ पकडले, तरी त्याचे पडसाद समाजात उमटतांना दिसत नाहीत. समाजात पकडले जाणारे अमली पदार्थ, म्हणजे हिमनगाचे टोक असते. अन्वेषण यंत्रणेद्वारे ४-५ टक्के अमली पदार्थ पकडले जात असतील, तर ९०-९५ टक्के अमली पदार्थांची तस्करी होते.

# वाकडीच्या खंडोबा मंदिरात हजारो भाविकांचे दर्शन

## लालबुंद विस्तवावरून चालत अनेक भाविकांची नवसपूर्ती

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा :** नेवासा तालुक्यातील वाकडी येथे चंपाषष्ठी निमित्ताने जागृत देवस्थान म्हणून नावलौकिक असलेल्या खंडोबाच्या यात्रा उत्सवासा निमित्ताने हजारो भाविकांनी दर्शन घेतले येथे अनेक दिवसांपासून चालत आलेल्या रुढीपरंपरेनुसार नवस्फूर्तीसाठी लालबुंद विस्तवातून चालत अनेक भाविकांनी आपली नवस्फुर्ती केली.वाकडी येथील गावचे ग्रामदैवत असलेल्या खंडोबाच्या मंदिरात चंपाषष्ठी निमित्ताने हजारो भाविकांनी दर्शन घेतले या परिसरातील भाविकांची या देवस्थानावर श्रद्धा असून या देवस्थानला दीडशे वर्षाची परंपरा असल्याने चंपाषष्ठी निमित्ताने परिसरात हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात या देवाला बोललेला नवस पूर्ण होतो अशी भाविकांची श्रद्धा असल्याने अनेक भाविक या ठिकाणी चंपाषष्ठीच्या दिवशी नवस बोलतात व तो नवस पूर्ण झाल्यावर लालबुंद विस्तवातून चालत नवस्फूर्ती केली जाते अशी अनोखी परंपरा या गावात अनेक दिवसांपासून सुरू आहे. या यात्रा उत्सवानिमित्ताने ग्रामस्थांकडून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यात छबिना कुस्त्याचा हगामा आदी प्रकारचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सरपंच शिवाजी जाधव ,माजी सरपंच संभाजी काळे, अमोल गायकवाड ,उपसरपंच भाऊसाहेब भडके, नानासाहेब जाधव , भाजपाचे अंकुश काळे ,पोलीस पाटील संतोष काळे, राजेंद्र कार्ले ,सागर भडके, कातकडे भाऊसाहेब, अमृतराव काळे, दिगंबर काळे, सुरेश गरगडे, अनिल जाधव यांनी परिश्रम घेतले.



वाकडी येथील खंडोबा मंदिरासमोरील लालबुंद विस्तवाच्या राडी मधून चालत आपला नवस स्फूर्ती करतांना महीला भाविक ( छाया - सोपान भगत)

### खंडोबा देवस्थानचा क वर्ग तीर्थक्षेत्रा समावेश व्हावा

वाकडी येथील खंडोबा देवस्थानला दीडशे वर्षापेक्षाही अधिक दिवसाची परंपरा असून या परिसरातील भाविकांची हे जागृत देवस्थान असलेची श्रद्धा असल्यामुळे या देवस्थानला नेवासा तालुक्यासह विविध जिल्ह्यातून भाविक येत असतात म्हणून या देवस्थानचा क वर्ग तीर्थक्षेत्रा मध्ये समावेश करण्यासाठी वाकडी ग्रामस्थ व भाविकांच्या वतीने नवनिर्वाचित लोकप्रिय आमदार विठ्ठलराव लंघे यच्याकडे आग्रह धरणार आहे.

**शिवाजी जाधव**
**(सरपंच वाकडी)**

# महापरिनिर्वाणदिनी संबोधी अकादमीच्या शिबिरात ६८ दात्यांचे रक्तदान

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त संबोधी अकादमीच्यावतीने आयोजित शिबिरात सुमारे ६८ रक्तदात्यांनी रक्तदान करून महामानवाला मानवंदना दिली.

संबोधी अकादमी २५ वर्षापासून हा उपक्रम महापरिनिर्वाणदिनदिनी राबवत आला आहे. शिबिरात संकलित होणारे रक्त शासकीय थलिसीमिया पीडित रुगांना दिले जाते. यावेळी संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे ,मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, वैद्यकीय सहसंचालक डॉ. शिवाजी सुक्रे ,माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, प्रादेशिक उपसंचालक जलील शेख आदी, प्रमुख उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने शिबिराची सुरुवात करण्यात आली. समाजभूषण हत्तीअंबीरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा गौरव करीत त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. सत्यसाई ब्लड बँकेचे डॉ. महेंद्रसिंग चव्हाण, डॉ. नंदिनी तिवारी, अरुण वाकडीकर, चरणसिंग चव्हाण, प्रियंका चौधरी यांनी तसेच प्रा. साईनाथ बोराळकर , प्रा. भाग्यश्री सातदिवे, प्रा. ज्ञानेश्वर हरकळ , प्रा. गजानन हुलगिर, आदींनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. .




# श्रीदत्त जयंती महोत्सवास गुरुचरित्र ग्रंथ वाचनाने प्रारंभ

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड येथील श्री दत्त जयंती महोत्सवास श्री दत्त मंदिर देवस्थान व गुरुदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्रीय संत हभप भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांचे पूजन करून व गुरुचरित्र ग्रंथ वाचनाने रविवारी भक्तीमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला.त्यानंतर उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराजांच्या हस्ते ज्ञानसागर येथे ग्रंथपूजन करून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचा शुभारंभ करण्यात आला.शनिवार दि.१४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता श्री दत्तजन्माचा मुख्य जन्म सोहळा होणार आहे.

श्री दत्तजयंती सोहळ्याच्या निमित्ताने तीर्थक्षेत्र देवगड येथे अखंड हरिनाम सप्ताह त्यानिमित्ताने कीर्तन महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने व गुरुदेव दत्त पिठाचे प्रमुख गुरुवर्य महंत राष्ट्रीय संत श्रद्धेय श्री भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

श्री दत्त जयंती महोत्सवाचा शुभारंभ रविवारी ग्रंथ पारायणाने करण्यात आला.या सोहळयात पहाटे ४ ते ४.३० मंगल सनई चौघडा वादन,४.३० ते ६.३० काकडा भजन,श्रींची प्रात:आरती, सकाळी ६.३० ते ७.३० दर्शन प्रदक्षिणा,७.३० ते ८.३० गीतापाठ, विष्णू सहस्त्रनाम, सकाळी ९ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामूहिक पारायण,११.३० ते १ भोजन, दुपारी १ ते ३ समयानुसार आलेल्या गुणवंतांचे कार्यक्रम, दुपारी ३ ते ५ सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ, श्रींची सायं आरती व दर्शन, रात्री ७ ते ८ भोजन,तर रात्री ८.३० ते १०.३० यावेळेत कीर्तन महोत्सव होणार आहे. श्री दत्त जन्म सोहळयाच्या निमित्ताने होणाऱ्या दत्त नाम यज्ञ सप्ताह व त्यानिमित्ताने आयोजित ज्ञानेश्वरी पारायणासह रात्री होणाऱ्या नामवंत किर्तनकारांच्या कीर्तन महोत्सवातील कीर्तन श्रवणाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री दत्त मंदिर संस्थान श्री क्षेत्र देवगड भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# उंदीरगावच्या तीन कन्यांना आंतरराष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक




**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव:** उंदिरंगावच्या तीन कन्या वैष्णवी दादासाहेब हजारे, सायली सर्जेराव आसने, धनश्री अप्पासाहेब डोखे यांनी नेपाळ येथे आंतरराष्ट्रीय लेव्हल तिरंदाजी (धनूर्विद्या)स्पर्धेत एकाग्रतेचा कास धरून सुवर्णपदकांची कमाई केली. त्यांना नंदकिशोर लांडगे प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजेते काल नेपाळ येथून निघाले असून आज श्रीरामपूरात आगमन होईल. या सर्वांचे अभिनंदन पवन पाऊलबुद्धे अशोक गलांडे, अप्पासाहेब डोखे, दादासाहेब हजारें सर्जेराव आसने आदिनी केले आहे

# आधारचे खासगीकरण रद्द करा:ज्ञानेश्वर धाबे

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** महाराष्ट्र शासनाने आधारचे काम खाजगी कंपनीला देण्याचा निर्णय घेतला आहे. तो निर्णय तात्काळ रद्द करा, अन्यथा लगतच्या काळात मोठे आंदोलन करावे लागेल असा इशारा महा ई सेवा केंद्राच्या राज्य अधिवेशनात अध्यक्ष ज्ञानेश्वर धाबे यांनी दिला. या प्रसंगी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातुन दोन हजार आधार व सेतु चालक मोठ्या संख्येने हजर होते.शिर्डी येथे राज्यस्तरीय एक दिवसीय राज्यातील सेतु चालक यांचे अधिवेशन नुकतेच संपन्न झाले. आधार व सेतुचालकानी चांगली सेवा जनतेला दिली. त्याच शासनाने आधारच्या खाजगीकरणाची अमलबजावणी सुरू केली. म्हणून सरकारच्या निषेधाचा ठराव यावेळी मांडण्यात आला. यावेळी आधार व सेतुचालक याच्या विविध अडचणी प्रलंबित कमिशन व किमान प्रति महिना दहा हजार मानधन मिळावे अशा विविध मागण्या करण्यात आल्या असलेल्या अडचणी व त्या बाबत असलेल्या मागण्या या विषयावर विचारमंथन करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे संघटनेच्या माध्यमातून सामुहिक प्रयत्न केले जाणार आहे. यावेळी सेतु चालक उपस्थित होते.

सेतु कार्यालयाला पूर्वीप्रमाणे महा इ सेवा केंद्र नाव देण्यात यावे. सेतु कार्यालय मधून जे विविध प्रकारचे दाखले दिले जातात त्या प्रत्येक दाखल्यामागे सेतु चालक याना शंभर रूपये इतके कमिशन देण्यात यावे ,राज्यातील सेतु चालक यांचा तसेच सेतु चालक यांच्या कुटुबाचा राज्य शासनामार्फत विमा उतरवन्यात यावा. नविन सेतु कार्यालयचे वाटप करू नये, आधार केंद्र चालक जे ओपरेटर आहे, त्यांना काळ्या यादीत समावेश करण्याअगोदर नोटिस देण्यात यावी. आधार कार्डचे कमिशन तात्काळ मिळावे ,सेतु चालक याना ग्रामपंचायत ऑपरेटर यांचे प्रमाणे मानधन मिळावे. तसेच आधार किट जमा करने संदर्भात जी शासनाने नोटिस दिली आहे त्या विरोधात सामुहिक लढा उभा करणे अशी भुमिका ठरवण्यात आली. विनोद तायडे उमंग शाह , गावडे, नंदाताईकोठले, जयश्री,शैलेन्द्र भोईटे, लुकेश शिंदे, कुंदन कोरडे,आनंद दलवी भुपेंद्र येडेकर नसोवर शेख प्रवीण पाटील प्रवीण मुंढे आदित्य देशमुख निलेश इंगळे निलेश भटकर, सुनिल शिंदे, बाबासाहेब आळतेकर, दत्ता चेवले, मनिष चौधरी, युनूस पठाण राजेश शिरपुरे उमजद बागवान आदी उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील सेतुचालक यानी हे अधिवेशनात यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



# भ्रष्टाचाराचा फटका सहन करून संघर्षमय जीवन

भ्रष्टाचार हा असा शाप आहे, जो देशाच्या विकासात अडथळा आणतो आणि असमानता, अन्याय, अशांतता, गरिबी, बेकारी, गुन्हेगारी, कमकुवत शासन व्यवस्था इत्यादी अनेक समस्यांना प्रोत्साहन देतो. यामुळे सर्वात जास्त नुकसान गरीब वर्गाचे आणि कर्तबगार लोकांचे होते, कारण त्यांना चांगल्या राहणीमानापर्यंत पोहोचण्याची संधी कमी मिळते, त्यांच्या फायद्याचा वाटा भ्रष्टाचाराच्या अन्यायाने दुसऱ्याला जातो. आपण सर्वजण आपल्या आयुष्यात अनेक कामांसाठी भ्रष्टाचाराचे बळी पडलेले आहोत किंवा पडतोय. क्वचितच असा दिवस असेल जेव्हा आपण भ्रष्टाचाराशी संबंधित बातम्या पाहत, वाचत किंवा ऐकत नाही. प्रत्येक विभागात किंवा क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यप्रणालीत कुठे अनुचित वर्तन होते हे माहीत असते, पण त्याविरुद्ध कोणीही आवाज उठवत नाही, लोभामुळे किंवा भीतीपोटी ते जसेच्या तसे सुरू ठेवू देतात. भ्रष्टाचाराने असंख्य जीवन उध्वस्त केले, या भ्रष्टाचाराचे परिणाम पीडित कुटुंबातील अनेक पिढ्यांना भोगावे लागत असते. शिफारस, राजकीय हस्तक्षेप, दबाव, सत्तेचा किंवा पदाचा दुरुपयोग यामुळे ही भ्रष्टाचाराला चालना मिळते. करप्शन परसेप्शन इंडेक्स २०२३ मध्ये ३९ गुणांसह भारत १८० देशांपैकी ९३ व्या क्रमांकावर आहे. जे २०२२ मध्ये ४० गुणांसह ८५ व्या स्थानावर होते.

नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्राध्यापक भरतीसाठी प्रत्येक पदास ५० ते ८० लाख रुपयांची लाच घेतल्याचे वृत्त दैनिक भास्कर या हिंदी वृत्तपत्राने १५ ऑगस्ट २०२४ रोजी आपल्या पहिल्या पानावर प्रसिद्ध केले होते. आजही या वृत्तपत्राच्या वेबसाईटवर जाऊन ही बातमी ऑनलाइन वाचता येते, नोकरभरतीच्या नावाखाली पैशांची मागणी होण्याची ही पहिलीच वेळ नाही. महाविद्यालयातील पदभरतीच्या या समस्येबाबत अनेक कुलगुरू व संबंधित विभाग, मंत्र्यांना कळवूनही कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही, अशा बातम्या यापूर्वीही प्रसिद्ध झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वी संभाजी नगर येथे एका महिला प्राध्यापिकेला पीएचडी संशोधक विद्यार्थ्याकडून ५ लाख रुपयांची लाच निश्चित करून पहिल्या हप्त्याची रक्कम घेताना पकडण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. अशा हजारो घटना घडतात, पण समाजाच्या निदर्शनास फार कमी येतात. अनेक विभागांमध्ये भ्रष्टाचार शांतपणे आपले काम करत आहे. सध्या राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये १२०० आणि महाविद्यालयांमध्ये ११ हजार मंजूर पदे रिक्त आहेत.

भ्रष्टाचाराच्या समस्येचा अनुभव जाणून घेण्यासाठी जर आपण एक खोटा उमेदवार म्हणून त्या-त्या भागात आपले काम करून घेण्यासाठी गेलो तरीही आपल्याला तेथील भ्रष्टाचाराच्या अन्यायकारक प्रथाची माहिती सहज मिळते. सर्वसामान्यांना सुद्धा सगळेच माहिती आहे. एखाद्या व्यक्तीने उच्च शिक्षण घेण्यासाठी आयुष्यातील मौल्यवान वेळ, पैसा आणि वय खर्च केले, म्हणजेच पात्रता असूनही नोकरी मिळवण्यासाठी त्याला लाच द्यावी लागली तर काय करावे? अशा परिस्थितीत प्रामाणिक आणि गरिबांनी उच्च शिक्षण घेणे गुन्हा ठरेल का? देशातील आर्थिक विषमतेची दरी अधिक खोलवर गेली आहे. श्रीमंत आणखी श्रीमंत आणि गरिबांचा तर संघर्ष कधीच संपत नाही. उच्च शिक्षणाची पदवी असलेले अनेक बेरोजगार जगण्यासाठी मजूरी सुद्धा करीत आहेत. जागतिक असमानता डेटाबेसनुसार, २०१४-१५ आणि २०२२-२३ दरम्यान, संपत्तीच्या एकाग्रतेच्या बाबतीत टॉप-एंड असमानता वाढली आहे. २०२२-२३ पर्यंत, शीर्ष १ टक्के चे उत्पन्न आणि संपत्तीचे समभाग (२२.६ टक्के आणि ४०.१ टक्के) त्यांच्या सर्वोच्च ऐतिहासिक पातळीवर आहेत आणि भारताचा सर्वोच्च १ टक्के उत्पन्नाचा वाटा जगात सर्वाधिक आहे, तो दक्षिण आफ्रिका, ब्राझील आणि यूएस पेक्षाही जास्त आहे.

असे अनेकदा म्हटले जाते, की या भ्रष्ट व्यवस्थेशी आपण एकटे लढू शकत नाही. जर आपण लाच देण्यास नकार दिला तर कोणीतरी आपल्यापेक्षा जास्त लाच द्यायला तयार आहे. एका प्रामाणिक माणसाने शंभर बेईमानांना काही फरक पडत नाही. मोठे उद्योगपती हजारो कोटींची कर्जे घेऊन परदेशात पळून जातात, तर येथील गरीब कर्ज फेडण्यासाठी आयुष्यभर धडपडत असतात. अनेकवेळा शासकीय कामे निर्धारित कालावधीत पूर्ण होत नाहीत, शासन बदलले तरी काम अपूर्णच, पहिल्याच पावसात रस्त्यावर पाणी साचून खड्डे पडतात आणि काही ठिकाणी पूल बांधल्याबरोबरच कोसळतात. सरकारी अधिकारी किंवा टेंडरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सुद्धा अनेकदा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होते. कायदा सर्व नागरिकांसाठी समान आहे, तरीही श्रीमंत, प्रभावशाली यांच्या तुलनेत गरीब सज्जन आणि प्रामाणिक लोक कायद्याला जास्त घाबरतात. नेत्यांची निवडणुकीतील आश्वासने आपल्याला पाच वर्षे आठवतात, पण ते विसरतात. तरीही नुसते म्हटल्याने आपली जबाबदारी किंवा आयुष्यातील संघर्ष संपत नाही, तर देशातील भ्रष्टाचार मुळापासून उखडून टाकण्यासाठी क्रांतिकारी पावले उचलण्याची गरज आहे. प्रत्येक सरकारी कामात पारदर्शकता, विश्वासार्हता, जबाबदारी आणि वेळेच्या मूल्याचे योग्य मूल्यमापन खूप महत्त्वाचे आहे.

नेते किंवा अधिकारी जितके उच्च पदांवर असतील तितके ते जनतेप्रती अधिक जबाबदार आणि उत्तरदायी असतात, परंतु त्यांच्या कामाबद्दल त्यांना जाब विचारण्याचे धाडस सामान्य माणसात कधीच होत नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदावरून मुक्त झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून ते सामान्य लोकांसारखे सामान्य जीवन जगतात, लोकही त्यांच्याशी सामान्यपणे वागतात, परंतु आपल्याकडे एकदा निवडून आलेले अनेक नगरसेवकही तश्याच थाटात आयुष्यभर जगताना दिसतात. आपल्या देशात मोठ्या संख्येने आमदार आणि खासदार करोडपती आहेत आणि लोकहितासाठी लोकांची निस्वार्थीपणे सेवा करण्यासाठी संधी मिळावी म्हणून निवडणुकीत निवडून येण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करतात. लोकसेवेसाठी धडपड करणारे असे नेते जगात अन्यत्र कुठेही मिळणे शक्य नाही. नुकतीच मी वर्तमानपत्रात बातमी वाचली की महाराष्ट्र राज्यात विधानसभेच्या निवडणुकीत अनेक उमेदवारांनी केलेला खर्च आणि निवडणूक आयोगाला दिलेल्या खर्चाचा तपशील यात मोठी तफावत आहे.भ्रष्टाचार निर्मूलन ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे, जागरूकता, धाडस, सुजाण नागरिक आणि माणुसकीच्या नात्याने आपण ही समस्या संपवू शकतो. देशातील प्रत्येक राज्यात, राज्य सरकारचा भ्रष्टाचारविरोधी विभाग आहे, ज्याची मदत आपण भ्रष्टाचाराशी संबंधित समस्यांच्या बाबतीत घेऊ शकतो. आपण ऑनलाइन तक्रार दाखल करू शकतो, टोल फ्री नंबरवर संपर्क साधू शकतो, ईमेल पाठवू शकतो, व्हॉट्सॲप नंबरवरही कनेक्ट होऊ शकतो. महाराष्ट्र राज्य सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०६४ किंवा व्हाट्सअप ९९३०९९७७०० वर कॉल करा किंवा रललुशलारळश्रारहर्रोश्रिळलश. सेीं.ळप वर ईमेल करा किंवा त्यांच्या वेबसाइट https://www.acbmahaashta.gov.in/bibe वर ऑनलाइन तक्रार लिंकवर क्लिक करून जनजागृती करू शकता. आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी इतरांचे हक्क हिसकावून न घेता, प्रामाणिकपणे आणि स्वाभिमानाने समाधानाने आयुष्य जगणे म्हणजे मानवता होय. हे व्रत घ्या की आपल्याला थोडा त्रास झाला तरी पण आपण सरकारी धोरणे, नियम आणि कायदे पाळू आणि कधीही भ्रष्टाचार करणार नाही किंवा खपवून घेणार नाही.

**- डॉ. प्रितम भी. गेडाम**
**मोबाईल/ व्हाट्सअप क्रमांक.**
**०८२३७४ १७०४१**
pitoo786gmail.com

# चाऱ्यांची दुरुस्ती झाल्यानंतरच रब्बी हंगामाचे रोटेशन सोडावे : राजेंद्र कोकणे

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** आगामी रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना फॉर्म भरण्याचे आवाहन जलसंपदा विभागाकडून झाले आहे. परंतु यावर्षी पाऊस समाधानकारक झाल्याने पाणी सोडण्यासाठीच्या चाऱ्या ,पोट चाऱ्या यामध्ये मोठे गवत झाडी, झुडपे वाढली असून चाऱ्या मधून पाणी प्रवाहित होण्यास अडचण येऊ शकते, पाणी सोडले तर पाण्याची नासाडी होऊन पाण्याचा अपव्यय होऊ शकतो, त्यामुळे अगोदर जलसंपदा विभागाने मेन चाऱ्या व पोट चाऱ्या यांची दुरुस्ती करावी मगच पाण्याचे रोटशन सोडावे. तसेच जलसंपदा विभागाने बऱ्याच वर्षांपासून चाऱ्या दुरुस्तीचे कामे केले नसल्याने काही चाऱ्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. तरी जलसंपदा विभागाने चाऱ्या दुरुस्त करून रोटेशन सोडावे अशी मागणी टाकळीभान येथील प्रगतशील शेतकरी राजेंद्र कोकणे यांनी केली आहे.

## निधन वार्ता

### चंद्रभागाबाई कांबळे

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**


**श्रीरामपूर :** तालुक्यातील खिर्डी येथील चंद्रभागाबाई सुर्यभान कांबळे (वय ९३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुलगे, दोन मुली, सूना व नातवंडे, असा मोठा परिवार आहे. त्या बबन, सुभाष, सोपान कांबळे व मथुरा देवरे, सत्यभामा तेलोरे यांच्या मातोश्री होत. तसेच एसटी कर्मचारी सचिन कांबळे यांच्या त्या आजी होत.



### सुभाषचंद्र येवले

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** माजी कामगार आयुक्त सुभाषचंद्र शंकरराव येवले (वय ७०) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक बहीण, पत्नी, दोन मुली, एक मुलगा नातवंड असा मोठा परिवार आहे. ते विराज यांचे वडील व आर्किटेक्ट विजयसिंह येवले यांचे चुलते होत.



द•ख•ल

## आदर्श विद्या मंदिरात जंतनाशक गोळ्यांचे वाटप

**सोनई** : प्राथमिक आरोग्य केंद्राच्यावतीने येथील आदर्श विद्या मंदिरातील १ ली ते ४ थी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत जंत नाशक गोळ्या वाटप करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर उपस्थित होते. त्यांनी आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर काय उपाय करावेत याचे मार्गदर्शन देऊन या गोळ्यांचे महत्व पटवून दिले. सध्या ढगाळ वातावरण असल्याने सर्दी, खोकला, ताप व धूळ यामुळे पोटदुखी होण्याचे प्रमाण वाढले आहे. म्हणून जंत ाशक गोळ्या लहान मुलांनी घेतल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अनिल दरंदले, सर्व शिक्षक-शिक्षिका विद्यार्थी उपस्थित होते.

## नेवासा तालुक्यातील गटसचिवांना सहकार प्रशिक्षण



**सोनई** :राष्ट्रीय स्तरावरून सहकार बळकटीकरण, सहकार प्रणाली मजबुतीकरण, शेतकऱ्यांसाठी स्वच्छ, पारदर्शक व ग्रामीण विकासाच्या नव्या योजनांबाबत सहकारीबरोबर देशाची, शेतकऱ्याची अर्थव्यवस्था सुधारेल यासाठी नेवासा तालुक्यातील सहकारी सेवा सोसायटीत कार्यरत असलेल्या गटसचिवांना दोन दिवसीय नाबार्डमार्फत सहकार प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हा सहकारी बँक नेवासा मार्केट शाखेत हे प्रशिक्षण झाले. नोडल ऑफिसर प्रकाश परहाड यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा विभागाचे प्रशिक्षक प्रतीक गरुड, सोनाली गायकवाड, प्रतिक्षा उभेदळ यांनी संपूर्ण व्यवहाराची माहिती विषद केली.यावेळी सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर, तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक, तालुका सचिव आप्पासाहेब बोर्डे, वैभव नागपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार प्रशिक्षण कार्यशाळा झाली. याप्रसंगी संभाजी चव्हाण, संपत नवले, संदीप आदमाने, सतीश पंडुरे, विठ्ठल खाटीक यांनी विचारलेल्या शंकांना समर्पक उत्तरे प्रशिक्षक प्रतीक गरुड, प्रतिक्षा उभेदळ, सोनाली गायकवाड यांनी दिली. व्ही. एम. खंडागळे यांनी मानले.

## पुणतांबा-राहाता बससेवेसाठी आंदोलन करणार : वहाडणे



**पुणतांबा** : पुणतांबा – राहाता बससेवा तातडीने सुरु करावी, या मागणीसाठी परिसरातील ग्रामस्थांच्यावतीने धडक आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी सेनेचे (मनसे) राहाता तालुक्याचे अध्यक्ष संदीप वहाडणे यांनी दिला आहे. परिसरातील ग्रामस्थ, जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला यांना विविध कामासाठी तालुक्याचे ठिकाण असलेल्या राहाता येथे जावे लागते. १९९९ मध्ये राहाता तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर गेल्या २५ वर्षापासून पुणतांबेकरांनी वारंवार मागणी करूनही ही बससेवा सुरु केली जात नाही. पुणतांबा गावची लोकसंख्या २० हजाराच्या पुढे आहे. पुणतांबा, जळगाव, चितळी, येलमवाडी, रामपूरवाडी गावची लोकसंख्या ३० हजारा पेक्षा जास्त आहे. पुणतांबेकरांना राहात्याला जाण्यासाठी शिर्डी मार्गे किंवा खैरी निमगावमार्गे जावे लागते. दोन्ही मार्गाने जातांना वेळ व पैसेही जास्त लागतात. त्यासाठी पुणतांबा चांगदेव नगर -जळगाव-एकरूखे -राहाता अशी किंवा पुणतांबा -शिर्डी - राहाता अशी सकाळ व सायकांळी अशा दोन वेळेस बससेवा सुरु करणे अत्यंत आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी आता आंदोलना शिवाय पर्याय नसल्याचेही वहाडणे यांनी स्पष्ट केले आहे

# विकासकामांचे बळकटीकरण करणे हे आमचे प्रथम कर्तव्य

## रामपूरवाडीचे सरपंच संदीप सुरडकर यांच्याशी 'राष्ट्र सह्याद्री'चा संवाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**चितळी** : विकासाचे ध्येयधोरण आखून ग्रामस्तरावरील सर्वच प्रश्न आम्ही अगदी कटीबद्ध पद्धतीने सोडवले आहे. चार वर्षाच्या काळात आम्ही रामपूरवाडी (ता.राहाता) येथील ग्रामपंचायतीचा कारभार अतिशय जबाबदारीपूर्वक पाहत आहे. सरपंचपदावर कार्यन्वित झाल्यापासून ग्रामस्थांच्या विश्वासास पात्र ठरलो आहे. शासनाकडून मिळणाऱ्या पायाभूत सुविधा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवून विकासकामांचे बळकटीकरण करणे आमचे प्रथम कर्तव्य आहे, अशी भावना सरपंच संदीप सुरडकर यांनी मराष्ट्र सह्याद्रीफशी बोलताना व्यक्त केली.

सुरडकर म्हणाले की कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या प्रथम महिला मा. आ. स्नेहलता कोल्हे, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, युवा नेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली रामपूरवाडी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामस्तरावरील विविध प्रश्न सोडवून स्थानिक पातळीवरील विकासकामे मार्गी लावण्यात यशस्वी झालो आहे.सुरुवातीला माझी कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती. परंतु स्नेहलता कोल्हे यांनी माझ्या कार्यकर्तृत्वाची दखल घेतली. रामपूरवाडीच्या स्थानिक स्वराज संस्थेत सरपंच म्हणून जबाबदारी पूर्वक काम करण्याची संधी दिली.

आम्ही गावातील प्रलंबित असणारे प्रश्न सोडविले. विकासकामे करण्यावर जास्त भर दिला. यात गावातील अंतर्गत रस्ते दुरुस्ती व सिमेंट काँक्रिटीकरण करणे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छ भारत अभियानांतर्गत ग्रामस्वछता अभियान, उन्हाळयात शेतकऱ्यांच्या दृष्टीने परिसरातील शेतीला पाणी मिळवून देण्याची मागणी यशस्वी ठरली. गावातील गावतळे भरून दिल्याने पाणी पातळीत भरघोस वाढ झाली आहे. गावातील सांडपाण्याची व्यवस्था अगदी काटेकोरपणे केली आहे. यापुढे असेच जनहिताचे कामे करत राहणार आहे. स्मशानभूमी सुधारणा याचबरोबर प्रामुख्याने रस्ते, वीज, आदीं प्रश्न मार्गी लावले आहेत. गावांमधील सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण पंचक्रोशीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहे सर्वच परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या देखरेखीखाली आहे. २०२४ वर्षात नुकतेच १५ व्या वित्त आयोगांच्या निधीतून रामपूरवाडी गावातील स्मशानभूमीच्या परिसरात पेव्हिंग-ब्लॉक बसवण्याचे, काँक्रिटीकरणाच्या रस्त्याचे काम सुरू होणार आहे. गावातील स्वच्छतेच्या सेवेकडे आम्ही पूर्णपणे लक्ष देत आहोत. पंधराव्या वित्त आयोगातूनच जून महिन्यात गावांतील ३०० कुटुंबांना मएक कुटुंब एक झाडफ या योजनेतून वृक्षाचे वाटप केले आहे. सर्वच कुटुंबांना ग्रामपंचायतीने दिलेल्या वृक्षाची लागवड केली आहे. त्यांचे संगोपन व सांभाळ करण्याची जबाबदारी दिली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही आम्ही योग्य पावलं उचलत असल्याचे सुरडकर म्हणाले..

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी १५ व्या वित्तआयोगाच्या निधीतून इंटरआक्टिव्ह बोर्ड उपलब्ध केले. दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत आंबेडकरनगर, लक्ष्मीनगर भागात लवकरच सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्याचे काम सुरू होईल. सार्वजनिक व धार्मिक परिसरात स्वच्छता ठेवली आहे. घरकुल योजनेसाठी प्रयत्न करून जवळपास परिसरातील ५ लाभार्थ्यांचे घरकुले मंजूर झाले असून काम सुरु आहे.

**- मंदा काळे, उपसरपंच**

स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या हिताच्यादृष्टीने सर्व शासकीय योजना राबवण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करत आहोत. बालविवाह प्रतिबंधक कायद्यासाठी ग्रामपंचायतीने ठराव मंजूर केला आहे. परिसरामध्ये बालविवाह होऊ न देण्याची भूमिका घेतली आहे. पंचक्रोशीत बेटी बचावो बेटी पढावो उपक्रम राबवित आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून महिला बचतगटांची स्थापना केली असून यामुळे महिलांना आर्थिक सक्षम करणे शक्य झाले..


**- संदीप सुरडकर, सरपंच, रामपूरवाडी**

## बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**चितळी :** परिसरामध्ये बिबट्याचा हौदोस वाढला असून काल (ता. ८) दुपारच्या सुमारास बिबट्यासदृश्य वन्यप्राण्याच्या हल्ल्यामध्ये शेळी गतप्राण झाल्याची घटना घडली शेळीवर हल्ला केल्यानंतर शेळ्यांच्या कळपापासून थोड्याच अंतरावर शेतकरी ऋषिकेश वाघ उभे होते. त्यांनी वेळीच हल्ला करण्याच्या तयारीत असलेल्या बिबट्याला आरडाओरड करून पिटाळून लावले. या घटनेने परिसरात घबराटीचे वातावरण पसरलेले आहे..

खंडोबा मंदिर परिसरात वास्तव्यास असणारे ऋषिकेश दशरथ वाघ हे नेहमीप्रमाणे दुपारी दोनच्या सुमारास चितळी-धनगरवाडी परिसरातील डिस्टीलरीच्या खड्ड्या शेजारी गाया व शेळ्यांचा कळप चारण्यासाठी घेऊन गेले होते. शेजारील पडिक शेतामध्ये चरत असलेल्या शेळीवर अचानक बिबट्याने हल्ला चढवून शेळीच्या नरडीचा घोट घेऊन



तिला जागीच ठार केले. बिबट्याने केलेल्या हल्ल्यामध्ये शेळी गतप्राण झाली. शेतकरी ऋषिकेश दशरथ वाघ यांच्यावर देखील बिबट्या हल्ला करणार होता. परंतु त्यांनी सतर्कता बाळगून त्यांच्या हातात असलेल्या काठीने बिबट्याला पिटाळून लावले. चितळी परिसरामध्ये बिबटयाचा वावर वाढलेला आहे या बिबट्याचा वेळीच बंदोबस्त करावा याचबरोबर वनविभागाने तात्काळ घडलेल्या घटनेचा पंचनामा करून नुकसानभरपाईची मदत द्यावी अशी मागणी वाघ व अतुल चौधरी यांच्यासब ग्रामस्थांनी केली आहे.

## हेमंत ओगले यांनी घेतली आमदारकीची शपथ

### श्रीरामपूर जिल्ह्यासाठी पहिल्याच दिवशी आक्रमक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार हेमंत ओगले यांनी आमदारकीची शपथ घेताना श्रीरामपूर जिल्हा झाला पाहिजे या आशयाची गांधी टोपी घालून संविधानाची प्रत हातात घेऊन विधान भवनात शपथ घेतली. यावेळी त्यांनी संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी आमदार ओगले म्हणाले की, श्रीरामपूर - राहुरी विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेने तसेच माजी आमदार स्वर्गीय जयंतराव ससाणे साहेबांच्या पुण्याईने आणि खा. शरद पवार, काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, प्रदेशाध्यक्ष नानासाहेब पटोले, शिवसेनाप्रमुख



उद्धव ठाकरे, माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेते मंडळींनी संधी दिल्यामुळे आणि महाविकास आघाडीच्या नेतेमंडळी व कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतल्याने आपण विधानभवनापर्यंत पोहचू शकलो.

निवडणुकीच्या निमित्ताने श्रीरामपूर जिल्हा झाला पाहिजे हा प्रश्न अजेंड्यावर आपण घेतला होता. म्हणून आज विधिमंडळात प्रवेश करतानाच पहिल्या दिवसापासून आपण श्रीरामपूर जिल्ह्याच्या विषयाबाबत सरकारचे लक्ष वेधणार असून त्यासाठी जे काही आवश्यक आहे ते आपण करणार असल्याचे ओगले यांनी सांगितले. श्रीरामपूर राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध राहणार असून शेती, पाणी याबरोबरच श्रीरामपूर एमआयडीसीमध्ये नवीन उद्योगांना चालना देऊन युवकांच्या रोजगार निर्मितीच्या प्रश्नावर आपण प्रयत्न करणार असल्याचे ओगले यांनी सांगीतले.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तालुक्यात तसेच शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील राजवाडा येथील समाज मंदिरात युवानेते हर्ष तनपुरे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देऊन भारत देशाला सर्वोत्कृष्ट असे संविधान देणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. त्यांच्या आज ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राहुरी तालुक्यात व शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. शहरातील राजवाडा येथील समाज मंदिरात हर्ष तनपुरे, पत्रकार राजेंद्र वाडेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राजवाडा येथील



जय भीम मित्र मंडळाच्यावतीने गेल्या दहा वर्षापासून राबविण्यात येत असलेल्या एक वही एक पेन या उपक्रमाचे हर्ष तनपुरे यांनी कौतुक केले. यावेळी अभिवादन कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या अनेक मान्यवरांनी वह्या व पेन भेट म्हणून दिले. सदर जमा झालेल्या वह्या व पेन तालुक्यातील गोरगरीब व गरजवंत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल, अशी माहिती भूषण साळवे यांनी दिली.

यावेळी आरपीआय तालुकाध्यक्ष विलास साळवे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व समाजातील गोरगरीब तसेच दलित व मागासवर्गीय समाजाचा उद्धार केला. हजारो वर्षांपासून अन्याय होत असलेल्या समाजाला वंचित व पिडीत समाजाला प्रवाहात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. शिरीष गायकवाड व अरुण साळवे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिरीष गायकवाड, आरपीआय जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, माजी नगरसेवक गजानन सातभाई, दीपक साळवे, संजय साळवे, पत्रकार मनोज साळवे, सतीश फुलसौंदर सुनील चांदणे, सागर साळवे, पिंटूनाना साळवे, महेश उदावंत, उत्तम साळवे, दादु साळवे, किरण साळवे, दीपक साळवे, नवीन साळवे आदी उपस्थित होते.

## मरावे परी कीर्तीरूपी उरावे हीच जीवनाची यशस्विता : कृष्णानंद महाराज



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगव :** मानवी जीवन अळवावरचे पाणी आहे. आई-बाप हेच आपले दैवत मानले तर जग सुखी होईल. मी २२ वर्ष वयाचा आहे आणि ३५ मुला-मुलींचा बाप होऊन त्या अनाथांसाठी समर्पित आहे. तीन मुलींचे लग्न करून दिले. सर्वांना शिक्षण देत आहे. माणूस केवळ स्वतःसाठी जगला तर मेला आणि इतरांसाठी जगलास तर खरा जगला यासाठीच मरावे परी कीर्तीरूपे उरावे हीच जीवनाची यशस्विता असल्याचे मत गोखलेवाडी येथील कृष्णानंद महाराज यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर- बेलापूरजवळील शीसाई विठ्ठल अनाथ आश्रमाचे मठाधिपती कृष्णानंद महाराज यांचे मांजरी येथे प्रवचन झाले. मेजर नंदकुमार सैंदोरे, रवींद्र सैंदोरे यांनी महाराजांचा सन्मान केला. साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी कृष्णानंद महाराजांचे अनाथांसाठी अपूर्व कार्य स्पष्ट केले. महाराजांनी देवकार्य हाती घेतले आहे. पण त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांचा अनाथांचा आश्रम म्हणजे एक सेवातीर्थ आहे. पण या सेवातीर्थासाठी देणाऱ्याचे हात हजारो वाढले पाहिजेत, असे उपाध्ये यांनी सांगितले. सैंदोरे परिवाराने आश्रमासाठी देणगी दिली. यावेळी सुभाषराव देशमुख, सुरेश गायकवाड, गणेशानंद उपाध्ये, प्रकाश महाराज सैंदोरे, कृष्णा सैंदोरे, प्राचार्य काकडे, कचरू जोर्वेकर, प्रा. विलासराव तुळे, गणेश वाडेकर, विजय कुंभार, निर्मिक उपाध्ये यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कृष्णानंद महाराज यांनी बाप कविता सादर करून संतराम त्र्यंबक सैंदोरे यांच्यासारखे देशभक्त, धार्मिक, शेतीमातीशी एकरूप झालेले व्यक्तिमात्व म्हणजे खरे जगणे दाखविणारे होते. जगा आणि जगू द्यावे हा संतांचा संदेश जपावा असे आवाहन करून वयाच्या१३ व्या वर्षापासून मी अनाथांचा नाथ झालो. देतो तो देव असतो. माणसाने देव होऊन जगावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अनाथ आश्रमातील विद्यार्थी उपस्थित होते. नंदकुमार सैंदोरे यांनी आभार मानले.

## कामगारांना जागा व घरे बांधून न दिल्यास मोर्चा : सुभाष कुलकर्णी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : शेती महामंडळाच्या कामगारांना तीन महिन्यांच्या आत दोन गुंठे जागा व घरे बांधून द्यावीत, अन्यथा शेती महामंडळाच्या मुख्यालयावर राज्यातील कामगारांचा मोर्चा नेण्यात येईल असा इशारा शेती महामंडळ लढा कृती समिती सरचिटणीस सुभाष कुलकर्णी यांनी दिला. तसा ठराव मेळाव्यात मंजूर करण्यात आला.

शेती महामंडळ कामगारांच्या विविध प्रश्नासाठी टिळकनगर येथे झालेल्या शेती महामंडळ कामगारांच्या मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रमेश




सूर्यवंशी होते. या मेळाव्यात अशोक पाटील, भालचंद्र कोल्हटकर, कारभारी त्रिभुवन, तुळशीराम हेलिंग, बबन झिने, राजू अग्रवाल, सुरेश जाधव अरुण काळे आदींनी मनोगत व्यक्त करून व्यथा मांडल्या.आतापर्यंत शासनाने ३ आदेश पारित करून महसूल व वन विभाग यांनी ग्रामपंचायतीला काही हेक्टर जमीन देण्याचा निर्णय झाला. सदर निर्णय घेताना कामगार संघटनाना विश्वासात घेतले नाही. या निर्णयाप्रमाणे कामगारांना दोन गुंठे राहण्यासाठी जागा मिळणार नाही व ज्यांचे घरकुल मंजूर आहे त्यांनाच फक्त अर्धा गुंठा जागा ग्रामपंचायतीच्या नियमाप्रमाणे मिळणार आहे. तसा आदेश शासन काढणार आहे. कामगार संघटनांना हे समजल्यावर संघटनेच्या मागणीनुसार ऑक्टोबर महिन्यात बैठक घेण्यात आली. कामगार संघटना प्रतिनिधींनी तो शासन आदेश मान्य नसल्याचे बैठकीत सांगितले. तरीही शासनाने १३ मार्चला आदेश काढून पढेगाव, एकलहरे, निपाणी वाडगाव या ग्रामपंचायतीला शेती महामंडळ कामगारांना घरकुलासाठी जागा देण्याचा आदेशात उल्लेख केला आहे. वरील तिन्ही गावामध्ये शेती महामंडळ कृष्णवाडी, मालवीयवाडी, लजपतरायवाडी हे विभाग टिळकनगर मळा वाडी वस्तीत येतात. इतर ७ विभाग येत नाहीत. शिवाय आदेशात २ गुंठे जागा देण्याचा कोठेही उल्लेख नाही. समान कामास समान वेतन, सेवा उपदानाचा निकाल लागूनही अपील केले जाते, बोनस मिळत नाही, चौथा, पाचवा वेतन आयोग दिला जात नाही, त्याचा फरक मिळत नाही इत्यादीची सविस्तर माहिती कुलकर्णी यांनी दिली. मेळाव्यास परिसरातील कामगार महिला, पुरुष मोठ्या उपस्थित होते. आभार प्रकारभारी त्रिभुवन यांनी मानले.

# समाजाचे अध:पतन रोखण्यासाठी धर्म व संस्कृतीची जोपसाना करा : मंडलिक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : लाखो भाविकांचे आराध्य व कुलदैवत खंडोबादेवाची सासूरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथील खंडोबा-म्हाळसादेवी, सच्चिदानंद बाबा, नारदमुनी मंदिरात चंपाषष्ठी उत्सवाची नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली. नव्याने बांधण्यात आलेल्या खंडोबा म्हाळसादेवी मंदिराचा पाचवा वर्धापनदिनही यावेळी साजरा करण्यात आला. आपली संस्कृती, धर्म, ग्रंथ काय आहेत, हे नव्या पिढीला सांगणे ही काळाची गरज असून यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे. समाजाचे होणारे अधः पतन रोखण्यासाठी धर्म व संस्कृतीची जोपासना करा, तिचे पालन करा असे आवाहन मंडलिक यांनी केले.

मंडलिक म्हणाले की, खंडोबा हे दैवत संपूर्ण देशाचे श्रध्दास्थान असून नेवासा बुद्रुक हे गाव त्यांची सासूरवाडी आहे. हे आपले भाग्य आहे, महाराष्ट्रासह तेलंगणा, कर्नाटक व इतर राज्यात त्यांची देवस्थाने असल्याचे त्यांनी सांगितले. आपली संस्कृती, धर्म, ग्रंथ यांची जोपासना प्रत्येकाने जीवनात करावी. कारण त्यावर आपला धर्म टिकून आहे, याची जाणीव देखील नव्या पिढीला करून द्या. ती काळाची गरज आहे. जगाला विसाव्याची गरज असून तो

### खंडोबा-म्हाळसादेवी मंदिरातील चंपाषष्ठी उत्सवाची सांगता



**नेवासा** : नेवासा बुद्रुक येथे चंपाषष्ठी उत्सवाच्या सांगताप्रसंगी झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलताना महंत उध्दवज महाराज मंडलिक समवेत भाविक. (छाया : सुधीर चव्हाण)

विसावा फक्त देवाच्या चरणीच मिळू शकतो असे सांगून त्यांनी समाजाचे पतन रोखण्यासाठी धर्म व संस्कृतीची जोपासना करा, तिचे पालन करा असे आवाहन केले

म्हाळसादेवी देवस्थानचे अध्यक्ष डॉ. मुरलीधर कराळे, विश्वस्त एकनाथ रेडे, प्रभाकर बोरकर, बाळासाहेब जपे, गणपत नळकांडे, रमेश काशीद, एकनाथ डोहळे, रावसाहेब पेचे, गोकुळ जायगुडे, सर्जेराव चव्हाण, अशोक काळे, रंजना भाकरे, अशोक मारकळी, केशव महाराज डौले, पुंजाराम पेचे यांच्या हस्ते उपस्थित संत महंतांचे संतपूजन यावेळी करण्यात आले. अखंड हरिनाम सप्ताहात योगदान देणाऱ्या अन्नदात्यांचा गौरव मंडलिक यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन करण्यात आला.

यावेळी बालयोगी महंत ऋषिनाथ महाराज, कोंडीराम महाराज पेचे, नंदकिशोर महाराज खरात, विजय महाराज पवार, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, लक्ष्मण महाराज नांगरे, सचिन महाराज पवार, नवनाथ महाराज घाडगे, जयाताई महाराज घाडगे, भिसे महाराज, माजी सरपंच आण्णाभाऊ पेचे, दादासाहेब कोकणे, केशव महाराज डौले, सेवेकरी पुंजाराम महाराज पेचे यांच्यासह हजारो भाविक यावेळी उपस्थित होते. भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत भाकरी व भरीत प्रसादाचे वाटप देवस्थानच्यावतीने करण्यात आले. चंपाषष्ठी उत्सवाच्या निमित्ताने लाखो भाविकांनी येथे येऊन दर्शन घेतले.

(पान १ वरुन)

## १०३ शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाकडून नोटिसा

यांना बढती मिळाली असून, नव्या सरकारचे ते मुख्यमंत्री आहेत. तर माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी अजित पवार यांच्याबरोबर उपमुख्यमंत्री असतील. दरम्यान आज विधानसभेच्या विशेष अधिवेशनादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लातूरमधील शेतकऱ्यांना महाराष्ट्र वक्फ बोर्डाकडून आलेल्या नोटीसांबाबत मोठे भाष्य केले आहे.

आज विधानसभेच्या विशेष अधिवशेनाच्या दुसऱ्या दिवशी माध्यमांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांना लातूरमधील शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाकडून आलेल्या नोटीसांबाबत विचारण्यात आले. तेव्हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'हे सामान्य लोकांचे सरकार आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणावरही अन्याय होऊ देणार नाही.

या संपूर्ण प्रकरणावर शेतकरी तुकाराम कानवटे म्हणाले की, 'आम्ही या जमिनीवर पिढ्यानपिढ्या शेती करत आहोत. ही वक्फ बोर्डाची मालमत्ता नाही. महाराष्ट्र सरकारने यात हस्तक्षेप करावा. या प्रकरणात आतापर्यंत २ वेळा सुनावणी झाली असून, पुढील सुनावणी २० डिसेंबरला होणार आहे.अल्लाह आणि इस्लामच्या नावावर धर्मादाय हेतूने दान केलेल्या संपत्तीला 'वक्फ' असे म्हटले जाते. ही संपत्ती स्थावर किंवा जंगम अशा दोन्ही स्वरूपात असू शकते. इस्लामिक कायद्याद्वारे मान्यताप्राप्त धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी कायमस्वरूपी मालमत्ता देणे म्हणजेच वक्फ. मुस्लिमांसाठी पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय ठरत असलेल्या कोणत्याही परोपकारी कारणासाठी ही संपत्ती दान केलेली असू शकते. एखाद्या मालमत्तेचा दीर्घ कालावधीसाठी धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी वापर केला जात असल्यास ती वक्फ मानली जाऊ शकते. या मालमत्तेचा वापर सामान्यत: शैक्षणिक संस्था, दफनभूमी, मशिदी आणि निवारा गृहे चालवण्यासाठी केला जातो.

## श्रीमंतांच्या यादीत मुंबई पहिल्या, पुणे दुसऱ्या क्रमांकावर

विकसित होणारे शहर आहे.महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत जिल्ह्यांच्या यादीमध्ये नाशिक जिल्हा चौथ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रातील हे महत्वाचे धर्मिक स्थळ आहे. येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी असते.नागपूर जिल्ह्याचा महाराष्ट्रातील श्रीमंत जिल्ह्यांची यादीमध्ये पाचवा क्रमांक लागतो. विदर्भात असलेला नागपूर जिल्हा महाराष्ट्राची टायगर कॅपिटल म्हणूनही ओळखला जातो.

# क्रीडाक्षेत्रातही करिअरच्या मोठ्या संधी : इनामदार

## प्राईड प्री स्कूल येथे क्रीडा स्पर्धा उत्साहात

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** विद्यार्थ्यांसाठी उत्तम शिक्षणाबरोबरच क्रीडाक्षेत्रही महत्त्वाचे असून त्यामध्येही करिअरच्या मोठ्या संधी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर मैदानी खेळांकडेही लक्ष द्यावे, असे प्रतिपादन कबड्डी खेळाडू पोलिस कॉन्स्टेबल वसीम इनामदार यांनी केले.

टाकळीभान प्राईड अकॅडमी प्री स्कूलच्यावतीने आयोजित केलेल्या क्रीडा दिनात ते बोलत होते. पंचायत समितीच्या मा. सभापती व प्राईड अकॅडमीच्या संस्थापिका डॉ. वंदना मुरकुटे, माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, ज्येष्ठ कबड्डी खेळाडू भैया पठाण, क्रीडा प्रशिक्षक रवी गाढे, पत्रकार संदीप बोडखे, श्यामसुंदर बडाख, बाळासाहेब दुधाळे, लताबाई भवार उपस्थित होते.

इनामदार म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणारी ही प्राईड अकॅडमी असून आम्ही प्रथमच स्कूलमधील इतक्या कमी वयातील विद्यार्थी यांच्यातील प्रगती पाहिली आहे. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी या विविध भाषांमधून अगदी स्पष्ट व उत्कृष्टपणे आपल्या वकृत्वातून मान्यवरांचे स्वागत केले. व इतक्या बालवयामध्ये विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जाणवला. असे विद्यार्थी घडविण्यासाठी येथील व्यवस्थापन कमिटी व शिक्षकांचे परिश्रम असून या स्कूलचे ते मोठे यश आहे. त्यामुळेच या प्राईड अकॅडमीचा लौकिक जिल्हा व राज्यभर पसरला आहे.

डॉ. वंदना मुरकुटे म्हणाल्या की, शहरामध्ये शिक्षणाच्या सोयी असून तेथे विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळून ते घडतात. परंतु तीच उत्तम दर्जेदार शिक्षणाची सोय ग्रामीण भागामध्ये होऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शहराप्रमाणे शिक्षणाची सोय व्हावी व येथील तळागाळातला विद्यार्थी जगाच्या स्पर्धेमध्ये चमकावा म्हणून आपण प्राईड अकॅडमीची स्थापना ग्रामीण भागामध्ये केली असून, ग्रामीण भागामध्ये डिजिटल स्कूल व विद्यार्थ्यांना सर्व सोयीनुक्त शिक्षणाची व्यवस्था आपण प्राईड अकॅडमी स्कूलमध्ये केली आहे.



आमच्या मुरकुटे कुटुंबीयांना समाजसेवेचा वारसा असून मुरकुटे कुटुंबियावर जे या तालुक्यातील लोकांनी प्रेम केले व त्यांच्यासाठी उतराई होण्याच्या निस्वार्थी भावनेतून प्राईड अकॅडमी स्कूल व ज्युनिअर कॉलेजची स्थापना केली आहे. येथे चांगले व दर्जेदार शिक्षण घेऊन विद्यार्थी घडतील व पुढच्या पिढ्यांना त्याचा फायदा होऊन आपल्या परिसराचा कायापालट होईल.

रवींद्र गाढे यांनीही प्राईड अकॅडमी येथील चिमुकल्यांचे कौतुक करून क्रीडा स्पर्धेस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राईड अकॅडमीचे क्रीडाशिक्षक गोराणे यांनी स्कूलच्या क्रीडा कामगिरी विषयी माहिती.पत्रकार अशोकराव रणनवरे, पत्रकार अर्जुन राऊत, रावसाहेब नाना वाघुले, बंडोपंत बोडखे, हर्षद मोरे, अभिमन्यू मुंगसे, मीनाबाई माने, बबलू वाघुले, अमोल कोकणे आदींसह ग्रामस्थ, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धांचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. प्राईम ॲकॅडमीच्या वतीने विजेत्या विद्यार्थ्यांस मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.आभार शिक्षिका जयश्री वाडेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक गोराणे, अदिती जंगम, निकिता शिरसाठ, सुप्रिया कोकणे, जयश्री वाडेकर आदींनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन उत्साहात

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** मुळा एज्युकेशनच्या कृषी महाविद्यालय सोनई, राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरी मोरे होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदिप तांबे उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. संदिप तांबे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजासाठी झगडले, जातिभेदाच्या विरोधात समानता आणण्याचे काम त्यांनी केले. अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. गरीब लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. जात-पात याला विद्यार्थ्यांनी न मानता, भेदभावाच्या भिंती बाजूला ठेवून आपला अभ्यास करावा. सज्जन आणि उत्तम नागरिक बनण्याचा प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा असे उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. हरी मोरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थतज्ञ, कायदेपंडित, भारतीय शेतीचा अभ्यास, शेतीचे धोरण निश्चित करणारे, भारतीय शेतीसाठी नदीवर धरणे बांधून सिंचनाची सोईबाबत विचार करणारे, निघुते निर्मितीसाठी धोरण ठरविणारे, सर्वांच्या समान हक्कासाठी लढणारे समाजसुधारक होते. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मोलाचा संदेश त्यांनी दिला. समानतेच्या न्यायासाठी त्यांनी धम्माचा स्वीकार केला. आपल्या वाङ्मयातून त्यांनी देश सुधारण्याचा उपाययोजना सांगितल्या. त्यांचा कुटुंबनियोजनावरदेखील चांगला अभ्यास होता. लोकशाही बळकटीसाठी त्यांचे विचार सर्वांनी अमलात आणावे. उदय दारकुंडे, अंकिता देशमुख, ऋषिकेश वाघोले, अनुष्का दहातोंडे, गिरीश गवांदे, हर्ष चिल्लारे, त्वरिता कावळे, चैतन्य साठे, प्रतीक्षा दाते, युगांत मुन, मनिष चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. समीक्षा ढोबळे व दीक्षा फरतडे यांनी सूत्रसंचालन केले तर अनुराधा दोरके यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रवरा हायस्कूलच्या यश पवारचे राष्ट्रीय स्पर्धेत उत्तुंग यश

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा हायस्कूल कोल्हार या सीबीएसई शाळेच्या यश पवार या विद्यार्थ्यांने ३९ राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत दैदीप्यमान यश संपादन केले आहे.

यश पवारची नुकतीच राज्यस्तरावर होणाऱ्या रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये निवड झाली होती. पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी मैदानावर झालेल्या रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये त्याने प्रथम क्रमांक मिळवत बिहारमधील नालंदा येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये प्रवेश मिळविला होता. नालंदा या ठिकाणी झालेल्या २६ व्या ऑल इंडिया कुमार इंटर स्कूल शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत यश क्वालिफाईड झाला. त्या स्पर्धेत ४०० पैकी ३८१ गुण मिळाले आहेत. त्याची भोपाळ या ठिकाणी होणाऱ्या ६८ व्या नॅशनल स्पर्धेमध्ये व इंटरनॅशनल स्पोर्ट्स शूटिंग फेडरेशनसाठी निवड झालेली आहे.यश पवार हा इयत्ता सातवीमध्ये शिकणारा विद्यार्थी असून मागील वर्षीदेखील त्याने असेच यश संपादन केले होते. सीबीएसई मध्ये शिकणाऱ्या या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये निवड झाल्याने पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे . राष्ट्रीय



स्तरावरील स्पर्धेनंतर याची आयएसएसएफ या आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड होणार आहे. त्याच्या या कामगिरीची दखल भारताची ऑलम्पिक आंतरराष्ट्रीय खेळाडू अंजली भागवत यांनी घेतली असून त्याचे अभिनंदन केले आहे आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत .

केंद्रीय शिक्षा बोर्ड डरे त्याला प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे. यश पवारला प्राध्यापक दीपक रणपिसे तसेच क्रीडा शिक्षक कदिर शेख यांचे मार्गदर्शन लाभले. यश पवारच्या या कामगिरी मध्ये त्याचे पालक प्राध्यापक राजेंद्र पवार यांचा मोठा वाटा आहे, अशी माहिती शाळेचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी दिली. त्याच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे, शालिनीताई विखे, सुजय विखे डॉ सुष्मिता विखे, लीलावती सरोदे, डॉ. सदानंद हिरेमठ यांनी अभिनंदन केले.

## बालाजी देडगाव येथे संत रोहिदास महाराजांना अभिवादन



**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** (प्रतिनिधी) नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे संत रोहिदास महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत रोहिदास महाराज मंदिरात आयोजित कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते श्री संत रोहिदास महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संत रोहिदास महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून महाराजांची आरती करण्यात आली व विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी शिक्षक संघटनेचे नेते संजयकुमार लाड सर, संत रोहिदास देवस्थानचे अध्यक्ष पत्रकार बन्सीभाऊ एडके, ज्ञानदेव मुंगसे (माऊली), संपत ससाणे, उत्तमराव तांबे, रवींद्र देविदास मुंगसे, संतोष दिक्षित आदी मान्यवर उपस्थित होते.

## सेवाभाव असल्याने वैद्यकीय शिबिरे यशस्वी : भोसले

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान शिर्डी व गीव्ह मी फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात (२०० रुम) आयोजित करण्यात आलेल्या प्लास्टीक सर्जरी शिबीराचे उदघाटन साईबाबा संस्थानचे प्र. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदिप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

भोसले म्हणाले की, रुग्णालयातील डॉक्टर्स, परिचारिका व इतर कर्मचारी यांच्या सेवाभाव वृत्तीमुळे शिबिरे गरीब व गरजू रुग्णांना वरदान ठरतात व रुग्णांना मोठा फायदा होत असून हिच ईश्वर सेवा आहे. यावेळी गीव्ह मी फाउंडेशनचे डॉ. राम चिलगर, डॉ. सुजित खोडे, डॉ. स्वाती पांडे, प्र. वैद्यकीय संचालक डॉ. प्रितम वडगावे, प्र. वैद्यकीयअधीक्षक डॉ. मैथिली पितांबरे, डॉ.राम नाईक, डॉ. विद्या बोऱ्हाडे, डॉ. रेवन येंगे, डॉ. गोविंद कलाटे, डॉ. मृणाली गोंदकर, डॉ. प्राजक्ता बनकर, जनसंपर्क अधिकारी सुरेश टोलमारे, प्र. अधिसेविका नजमा सय्यद यांच्यासह रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.मैथिली पितांबरे यांनी केले तर आभार सुरेश टोलमारे यांनी मानले.



## जगनाडे महारांजांनी समाजाला दिशा देण्याचे काम केले : पुरे

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** संत संताजी जगनाडे महाराज यांनी समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. त्यांच्या कार्यातून समाजात प्रबोधन होऊन समाज सजग झाला. त्यांचे विचार आजही सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन ग्रंथपाल स्वाती पुरे यांनी केले.

श्रीरामपूर नगर परिषदेच्या लोकमान्य टिळक वाचनालयांच्यावतीने मानवधर्माची आणि लोककल्याणाची शिकवण देत समाजाचा उद्धार करणारे महान संत संताजी जगनाडे महाराज यांना जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस हार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यावेळी पुरे बोलत होत्या. वनदेव सोनवणे, नितीन नागले, नंदकिशोर राऊत, प्रकाश काळे, अतुल साळुंके, किरण सोनवणे, राजेश चौथे, रोहित कर्पे, ऋषिकेश शेजुळ, शिंदे, जगन्नाथ कर्पे, अनिल जाधव,अशोक चौथे, सोमनाथ राऊत, अनिल दळवी, सोमनाथ आढाव, रामदास गायकवाड, राहुल गाडेकर, निलेश नागले, मनोज म्हस्के, किरण गायकवाड, नंदकिशोर कटके, गणेश कटके, प्रल्हाद साळुंके, कंचन चावरे, संगीता रासकर, सुमन रायकर, रुक्मिणी क्षत्रिय, सिद्धार्थ गवारे, राजेश जेधे, स्वप्निल माळवे, संदीप कारवाळ, यश अहिरे, साक्षी अहिरे, विजय झिंगारे आदी उपस्थित होते.



## स्वच्छतादूत समाजाचे खरे आरोग्य दूत:मोरे



**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** स्वच्छतादूत समाजाचे खरे आरोग्य दूत असून कोरोनासारख्या महामारीमध्येही या स्वच्छतादूतांनी मोलाची कामगिरी बजावून लोकांचे आरोग्य अबाधित ठेवण्याचे पुण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी केले

ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभानच्यावतीने नगर परिषदेच्या सफाई कामगारांना साहित्य वाटप कार्यक्रम मोरे बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीधर गाडे होते. यावेळी श्रीरामपूर नगर परिषदेच्या ५५ सफाई कामगारांना टी-शर्ट, कॅप व मास्कचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरण मंडळाचे राज्यसचिव प्रा. अनिल लोखंडे, दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे उपसंपादक प्रदीप आहेर, राज्य संघटक प्रा. डॉ. शरद दुधाट, राज्य सहसचिव संजय गायकवाड, नगर परिषदेचे आरोग्य अधिकारी आर. के. घायवट, एस. बी.आरणे , जिल्हा परिषद शाळा केंद्रप्रमुख शिंदे व मिशन समितीचे बाळासाहेब जपे, भैया पठाण, दिगंबर मगर आदी प्रमुख उपस्थित होते.

मोरे म्हणाले की ५० ओडिग्री सेल्सिअसच्या पुढे तापमान गेल्यास जीवसृष्टीसाठी हानिकारक ठरू शकते. शेतातील पिके येण्यासही अडचण येऊ शकते. पृथ्वीचे तापमान आटोक्यात ठेवायचे असल्यास वृक्षारोपण एकमेव पर्याय असून मानवी अस्तित्व टिकवण्यासाठी प्रत्येकाने झाडे लावून त्याचे संवर्धन करावे. कोरोना काळामध्ये लोकांकडे खूप पैसा असूनदेखील लोकांना ऑक्सीजन मिळाला नाही. व ऑक्सिजनअभावी अनेकांना प्राण गमवावे लागले. निसर्गाने पाणी, हवा मानवाला मोफत दिली. परंतु मानव आपल्या विध्वंस प्रवृत्तीने निसर्गावर अत्याचार करत आहे. त्यामुळे नद्या नाल्यांमध्ये शुद्ध जल राहिले नसून दुर्गंधी पसरत आहे. जास्त भौतिक सुविधा व औद्योगिकीकरणाच्या नावाखाली वायूप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून चांगला श्वास मिळणे व शुद्ध हवा मिळणे कठीण झाले आहे. मानवच स्वतःचे अस्तित्व संपवत आहे. आपण जर आज निसर्गाच्या हानीकडे लक्ष दिले नाही व ही बाब गंभीर्याने घेतली नाही तर येणाऱ्या पिढ्या आपल्याला माफ करणार नाहीत.

या कार्यक्रमामुळे सर्व स्वच्छतादूतांना मोठे प्रोत्साहन मिळाले. उपक्रमाचे सर्व मान्यवर व उपस्थित यांनी कौतुक केले. यावेळी डॉ.अनिल लोखंडे प्रदीप आहेर, डॉ. घायवट, संजय गायकवाड, बाळासाहेब जपे, शिंदे आदींनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक प्रा. डॉक्टर शरद दुधाट यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्यकारणी सदस्य अर्जुन राऊत यांनी केले. आभार पर्यावरण मंडळाच्या पदाधिकारी बेबी कांबळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्ञानज्योती संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत, उपाध्यक्ष संदीप पटारे, सुदाम पटारे, प्रा.डॉ. मनीषा माने/नवले आदींसह पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी, नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**इंग्रजी व मराठी टायपिस्ट अर्जंट नेमणे आहे.**

श्रीरामपूर येथील कार्यालयीन अनुभवी इंग्रजी व मराठी टायपिस्टची आवश्यकता आहे. अनुभवी / इच्छुकांनी शैक्षणिक व काम केले बाबतचे अनुभवाचे प्रमाणपत्रासह खालील पत्त्यावर संपर्क साधावा. ॲड. शबाना शेख ॲड. बाबा शेख स्टेडियम, पहिल्या मजला, कोर्टा शेजारी, वार्ड नंबर १, श्रीरामपूर. फोन नंबर ९४२३७८६०९८, ९४२२२२२९८५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४**

| | | | |
|---|---|---|---|
| **मिलनम डे** | | | |
| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
| १२९<br>४८०<br>६६० | २-५ | १२४<br>४६७<br>७०० | जोड<br>२१-०७-६३<br>८९-७५ |
| **कल्याण** | | | |
| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
| १२०<br>४९०<br>६७० | ३-० | १९०<br>२८०<br>२४४ | जोड<br>३१-८०-९६<br>५७-02 |
| **मुंबैम (मेन)** | | | |
| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
| १४०<br>७८०<br>६९० | ५-४ | १३०<br>१४९<br>११४ | जोड<br>५६-९४-७८<br>१२-४० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द•ख•ल

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने उद्या निषेध आंदोलन

**अहिल्यानगर** : अदानी उद्योगातील भ्रष्टाचार, वाढती महागाई, बेरोजगारी, मणिपूर राज्यातील अस्थिरता, आणि ईव्हीएम विरोधात आवाज उठवण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १० डिसेंबर रोजी देशव्यापी निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून अहमदनगर जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, सकाळी ११:३० वाजता निदर्शने करण्यात येणार आहेत.

पक्षाचे जिल्हा सचिव ड. कॉ. बन्सी सातपुते यांनी दिलेल्या माहितीनुसार या आंदोलनात जिल्ह्यातील कार्यकर्ते, विविध जनसंघटनांचे पदाधिकारी, आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## पुणे येथे स्वाभिमानी मराठा महासंघाची बैठक



**लिंपणगाव** : स्वाभिमानी मराठा महासंघाची व्याप्ती संपूर्ण भारत देशामध्ये आहे हे एक अराजकीय संघटन आहे लवकरच पंढरपूर येथे संपुर्ण भारत देशातील पदाधिकारी यांची महासंवाद बैठक संपन्न होणार आहे त्या अनुषंगाने संस्थापक डॉ.कृषिराज टकले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष निलेश धुमाळ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पुर्वतयारी आढावा बैठक संपन्न झाली , संपूर्ण भारत देशातील पदाधिकारी महा संवाद बैठकीच्या निमित्ताने येणार असल्याने नियोजनात्मक आराखडा तयार करण्यासाठी सर्व पदाधिकारी यांची मते जाणून घेवून नियोजन करण्यात आले आहे बैठकीच्या निमित्ताने स्वाभिमानी मराठा महासंघाचे राज्य निरीक्षक भानुदास वाबळे पाटील; ओमराजे निंबाळकर, , अनिता पाटील,अमृत पठारे , ज्योती सातव, शंभुप्रिया जांभळे,सिता जाधव ,वंदना घोलप, वैशाली बहिरट,सुमन वाळुंज,मीरा शिंदे, दिपाली पाटील, शितलकुमार गाजरे ,लहु सातपुते,सतिश भोरडे, ज्ञानेश्वर गायकवाड श्रीकांत हारदे ई.पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ.अमोल बागुल यांच्या बासरीचे सूर राष्ट्रपती भवनात उमटले


**अहिल्यानगर** : भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय व ईशान्य क्षेत्र विकास मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रपती निलयम भवन येथे आयोजित भारतीय कला महोत्सवामध्ये येथील दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिके विजेते कलाकार-बासरीवादक डॉ.अमोल बागुल यांचे बासरी वादन संपन्न झाले.भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या महोत्सवाच्या पहिल्या आवृत्तीचे उद्घाटन संपन्न झाले. या महोत्सवाचे विशेष निमंत्रण डॉ.बागूल यांना प्राप्त झाले होते.सुमारे दहा मिनिटांच्या सादरीकरणात बासरीवादनातून विविध रागदारी प्रस्तुत केल्यामुळे आयोजन समितीच्या वतीने सहभागींचा सत्कार करण्यात आला.

# गटविकास अधिकाऱ्यांच्या विरोधात आज भीक मागो आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : गेल्या दोन महिन्यापासून श्रीगोंदा पंचायत समिती समाज कल्याण विभागाचे देयके गटविकास अधिकारी आणि वरिष्ठ सहाय्यक यांच्या मनमर्जी कारभारामुळे मुद्दामून थांबवली गेल्यामुळे त्याचा फटका श्रीगोंदा तालुक्यातील विकास कामांवर मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे विकास कामांना खीळ बसत आहे. सदर बाब वारंवार जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कानावर घालून सुद्धा ते जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे कंत्राटदार यांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. परिणामी कंत्राटदारांचे आर्थिक शोषण होत आहे. हे सध्याचे चित्र आहे आणि याला जबाबदार गटविकास अधिकारी व वरिष्ठ सहाय्यक हेच आहेत. सदरील वरिष्ठ सहाय्यक समाज कल्याण या विभागामध्ये मागील काही दिवसापूर्वी सेवा निलंबित झालेला असून जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या हेतूने त्यांच्याकडे तो पदभार गटविकास अधिकारी यांनी सोपवला आहे.तरी वरिष्ठ पातळीवर चौकशी व्हावी अशी मागणी कंत्राटदार महासंघ करीत आहे. समाज-कल्याण विभागमध्ये दर दोन - तीन महिन्याला पदभारामध्ये फेरबदल केला जातो. यामागे नक्कीच काहीतरी हित संबंध असल्याचे चर्चा तालुक्यांमध्ये होत आहे,तरी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सोमवार दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी माननीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनामध्ये ठेकेदार कामगार मजुरासह भीक मागो आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती गणेश श्रीराम यांनी दिली आहे.

## आरपीआयच्या शहर जिल्हाध्यक्षपदी अजीम खान



**अहिल्यानगर** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्षपदी अजीम खान यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय नेते डॉ. राजेंद्र गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शहर जिल्हा अध्यक्ष सुशांत मस्के यांच्या नेतृत्वाखाली निवडीचे पत्र देण्यात आले व यावेळी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय नेतेडॉ. राजेंद्र गवई समवेत पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के आदीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुशांत म्हस्के म्हणाले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे कार्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालत आहे. सर्व जाती-धर्माला बरोबर घेऊन कार्य सुरु असून, जातीयवादी शक्तीच्या विरोधात पक्ष उभा असून सामान्य नागरिकांच्या विविध प्रश्न सोडवण्यासाठी पक्ष उभा असल्याची भावना व्यक्त केली व नवनिर्वाचित अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अजीम खान म्हणाले की, पक्षाच्या ध्येय धोरणानुसार काम करुन शहरात पक्ष वाढविण्याचा संकल्प केला असून अल्पसंख्यांक समाजाच्या अनेक अडीअडचणी सोडून प्रत्येक शासकीय योजना ची माहिती घरोघरी देणार व पक्ष वाढीसाठी मदत करणार असल्याची भावना व्यक्त केली तर या निवडीबद्दल खान यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शताब्दी महोत्सव सोहळ्यात

## नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे : राम महाराज




**शेवगाव** : भगवानगडाचे महंत वैकुंठवासी भगवानबाबा यांनी १९२५ साली सुरु करून दिलेला आणि महंत वैकुंठवासी भिमसिंह महाराज यांच्या कृपा आर्शिवादाने सुरू असलेल्या शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील गोपाल कृष्ण जन्माष्टमी निमित्त होत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास या वर्षी शताब्दी महोत्सव मोठ्या प्रमाणात करण्यासाठी आखेगांव येथील जोग महाराज संस्थांचे महंत राम महाराज झिंर्जुके यांच्या उपस्थितीत बालमटाकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर रविवार दि. ८रोजी ग्रामस्थांची बैठक संपन्न झाली असुन भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांना देखील या महोत्सवासाठी निमंत्रण देण्यात येणार असून शताब्दीसाठी नामांकित संत-महंतांची उपस्थिती कार्यक्रमासाठी राहावी यासाठी राम महाराज झिंजुर्के यांच्या नेतृत्वाखाली नियोजन राहणार असल्याने ग्रामस्थांनी विविध मार्गाने शताब्दीसाठी सक्रिय सहभागी होऊन योगदान देण्याचे आवाहनही यावेळी राम महाराज झिंजुर्के महाराज यांनी केले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व देवी देवतांसह ग्रामदैवत श्री बालंबिका देवी मंदिरात अक्षदा, श्रीफळ अर्पण करून महाराजांच्या हस्ते निमंत्रण देण्यात आले. यावेळी सरपंच डॉ. राम बामदळे, शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, ज्ञानेश्वर कारखान्याचे माजी संचालक मोहनराव देशमुख, चंद्रकांत गरड, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष तुषारभाऊ वैद्य, साध्वी शितलताई देशमुख, राहुल महाराज गरड, घाडगे महाराज, रामायणाचार्य रामेश्वर महाराज देशमुख, उपसरपंच सर्जेराव घोरपडे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष कासमभाई शेख, माजी सरपंच अशोकराव खिळे, नामदेव घाडगे, सेवा संस्थेचे माजी चेअरमन प्रशांत देशमुख, भानुदास गलधर, सुदामराव शिंदे, सेवा संस्थेचे माजी चेअरमन हरिश्चंद्र घाडगे, विक्रम बारवकर, हरिभाऊ शिंदे, बाळासाहेब दोडके, शांतिलिंग मानूरकर, मधुकर पाटेकर, किरण पाथरकर, दीपक सपकाळ, अशोक गुंजाळ, बिरजू परदेशी यांच्यासह आदी ग्रामस्थ, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ढगाळ हवामानामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव

**ढोरजळगांव** : ढोरजळगांव (ता.शेवगाव) सह परिसरात गेल्या पाच दिवसापासुन आकाशातील ढगांच्या चादरीमुळे आणि शुक्रवार ता.०६ रोजी झालेल्या पावसाच्या सरीमुळे खरीपातील तूर तर रब्बीतील उभ्या असलेल्या पिकावर परिणाम पहायला मिळत आहे, निसर्गाच्या सततच्या संकटामुळे शेतकरी मात्र मेटाकुटीला आला आहे.

शेवगाव तालुक्याच्या पश्चिम भागात कपाशीचे पिक जेमतेम पदरात पडल्यानंतर उभ्या असलेल्या तुरी आणि रब्बीच्या उत्पादनांतून संसाराचा गाडा चालवता येईल या आशेवर असतांनांच अवकाळी पाऊस व सततच्या ढगाळ हवामानामुळे तुर ,कांदा, हरबरा, गहू या पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव जाणवू लागला आहे. शेतकऱ्यांसमोर दिवसेंदिवस नवे संकट उभे रहात असल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

गेल्या दोन ते तीन वर्षांपासून पावसाचे चक्र पुर्णपणे बदलले असून, प्रत्येक ऋतूत अवकाळी तसेच ढगाळ वातावरणामुळे पिकांवर किडींचा प्रादुर्भाव झाल्याने संक्रांत पहायला मिळत आहे. खरीप हंगामात कपाशीची लागवड ७ जूनला झाली परंतु ऐनवेळी पावसाने पाठ फिरवून नंतर सततच्या पावसामुळे कपाशी उत्पादनावर त्याचा परिणाम पहायला मिळाला. उरल्यासुरल्या कपाशी पिकातून घरखर्च भागुन उसनवारी देता येईल या आशेवर कपाशी पिकाकडे पाहिले जात असतांना कपाशीच्या क्विटलंला साडेसात हजार या हमी भावापेक्षा खाजगी व्यापाऱ्याकडून सुरुवातीला ६५०० ते ६८०० पर्यंत कपाशी खरेदी करण्यात आली. कपाशीवर झालेल्या खर्चाचा ताळमेळ बसत नसतांना बळीराजाकडून पुन्हा रब्बीसाठी कंबर कसून तयारी केली, रब्बी हंगाम आक्टोबर महिन्यात सुरु झाल्यानंतर शेतकऱ्यांकडुन काहीप्रमाणात गहु, हरभरा जामनीआड करण्यात आला. यामध्ये गहु, हरबऱ्याची पिकं ताशी लागली परंतु कोवळा कोंब असतानीच सततच्या ढगाळ वातावरणांमुळे पिवळा पडला आहे तर गव्हावर माव्याचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. सततच्या ढगाळ हवामानांमुळे कांद्याची रोपे व लागवड केलेल्या कांदा तसेच गहू आणि हरबऱ्याचा पेरा वाया जाऊ नये म्हणून रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बळीराजाकडुन औषधाच्या फवारण्या केल्या जात आहेत.



## दहिगावनेत संताजी महाराज जगनाडे जयंती उत्साहात

**ढोरजळगांव** : राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराज यांना दहिगांवने दि ८ रविवार रोजी येथे ४००वी जयंती निमित्त तिळवण तेली समाज बांधवांच्या वतीने विनम् अभिवादन करण्यात आले . प्रसंगी जगद्गुरु संत तुकाराम महाराज व संताजी महाराज जगनाडे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रामभाऊ सोनवणे ,बापूराव मरकड ,रामनाथ राठी ,प्रकाश लोखंडे ,विष्णु सोनवणे ,बाळासाहेब लोखंडे ,जगन्नाथ सोनवणे , डिंगबर लोखंडे ,प्रदिप सोनवणे ,ग्रामपंचायत सदस्य गोटीराम काळे ,किरण लोखंडे, बबन पानकर,विश्वनाथ सोनवणे,शिवाजी सोनवणे, राजेंद्र लोखंडे ,राजेंद्र सोनवणे ,प्रदिप सोनवणे, संजय सोनवणे, शिवाजी सोनवणे ,अनंत सोनवणे ,गोरख लोणकर यांचेसह ग्रामस्थ व तिळवण तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## झेंसर टेक्नॉलॉजी कंपनीत नोकरीसाठी फरहान शेखची निवड

अहमदनगर महाविद्यालयाच्या वतीने सत्कार



**अहिल्यानगर** : अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन त्यांना चांगले नोकरीच्या संधी उपलब्ध व्हावे यासाठी अनेक कॅम्पस मुलाखती आयोजन करण्यात येते यामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होतात बघतेस महाविद्यालयाच्या वतीने कॅम्पस मुलाखतीमध्ये झेंसर टेक्नॉलॉजी लिमिटेड या कंपनीने फरहान शेख या विद्यार्थ्याचे निवड करून त्याला या संस्थेमध्ये स्थान देण्यात आले. फरहान शेख जो सध्या एमएससी द्वितीय वर्षात आहे आणि अहमदनगर महाविद्यालयातून बीसीएस पूर्ण केले आहे, त्याला झेंसर टेक्नॉलॉजी लिमिटेडमध्ये स्थान देण्यात आले आहे. हि झेंसर हि संस्था आरोग्यसेवा, शिक्षण इत्यादींसह अभियांत्रिकी सेवा, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, सुरक्षा सेवा इत्यादींमध्ये काम करत आहे. फरहान त्याच्या पहिल्या वर्षात सर्वोच्च रँकर आहे आणि त्याला ६.५ लाख प्रतिवर्ष पॅकेजच्या पहिल्या कमाईसह एआय क्षेत्रात पोस्टिंग मिळाली आहे.या यशाबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जे.बार्नबस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नॉन ग्रँड चे समन्वयक डॉ. सय्यद रज्जाक, शितल अत्रे, माधुरी देठे, रूपाली कुलकर्णी आणि शिक्षक वर्ग आदी उपस्थित होतो.

## दत्त जन्मोत्सवानिमित्त सामुदायिक गुरुचरित्र पारायणास प्रारंभ



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री.स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती जन्मोत्सवानिमित्त गुरुचरित्र पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला आहे. या सामुदायिक पारायण सोहळ्यास भाविकांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गुरुचरित्र पारायण्याचे ५३ अध्याय असून दररोज दुपारी साडेबारा ते तीन वाजेपर्यंत वाचन होते. या सोहळ्याचे व्यासपीठ चालक निखिल देवरे गुरुजी असून भाविकांना आपल्या रसाळ अमृतवाणीतून ते पारायण सांगत आहेत.शनिवार ता. १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६वा.वाजता दत्त जन्मोत्सव साजरा होणार असून ७ वा. भक्ती गीतांचा कार्यक्रम होऊन रात्री साडेनऊ वाजता शेजारती होईल. या उत्सवाची सांगता रविवार ता.१५ डिसेंबर रोजी होणार असून या दिवशी पहाटे ५ वा.रुद्राभिषेक, सकाळी ९ वा. श्री. दत्त याग, दुपारी साडेबारा वाजता नैवेद्य आरती, दुपारी १ते ३ महाप्रसाद असे कार्यक्रम होऊन उत्सवाची सांगता होईल. तरी भाविकांनी या सप्ताहात उपस्थित राहून पारायण सोहळा, दत्तजन्मोत्सव, महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.

## क्वांटम संगणक हेच भविष्यातील तंत्रज्ञान : प्रा. सुनील कल्हापुरे



**अहिल्यानगर** : विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील महाव्दियालयत क्वांटम ऍक्सिलरेटेड टेक्नोलॉजि या विषयावर एक दिवसीय शिक्षक विकास कार्यशाळा संपन्न झाली.या एकदिवसीय कार्यशाळेसाठी सी-डेक पुणे येथील संगणक तज्ञ निखिलेश गायकवाड, कनिष्का, आशय अभिषेक विशू हे तज्ञ म्हणून लाभले. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी संस्थेचे डेप्युटी डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे प्राचार्य डॉ.उदय नाईक माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. दिपक विधाते कॉम्पुटर सायन्स आणि डिसाइन विभाग प्रमुख डॉ. आर. एस. तांबे तसेच सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विध्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळेच्या सुरवातीला प्रा.सौ.पूजा वैकर यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट व स्वरूप विषद केले. क्वांटम कॉम्पुटिंग हे एक अत्याधुनिक संगणक असून हे कॉम्पुटर सायन्स फिसिकस, मॅथेमॅटिकस या शाखेतील विविध पैलूंचा समावेश असलेले बहू विषय क्षेत्र आहे जे पारंपारिक संगणकाच्या तुलनेत क्लिष्ट समस्या जलद गतीने सोडवण्यासाठी क्योंट्म मेक्यानिकस चा वापर करते. या क्षेत्रामध्ये हार्डवेअर संशोधन आणि अनुप्रयोग विकास समाविष्ट आहे. क्वांटम संगणक हेच भविष्यातील तंत्रज्ञान असणार असून अतिशय वेगवान काम करून भविष्यात नवीन चित्र उभे करणार आहे. तरी या अत्याधुनिक विषयाचा लाभ शिक्षक तसेच विध्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या माध्यमातून घ्यावा. असे आवाहन संस्थेचे डेप्युटी डायरेक्टर प्रा सुनील कल्हापुरे यांनी केले. या वेळी सी-डेक पुणे येथील तज्ज्ञांनी क्वांटम कॉम्पुटिंग वरील सर्व मूलभूत संज्ञा अत्यंत प्रभावी पणे समजावून सांगितल्या त्याच प्रमाणे क्योंट्स कॉम्पुटिंग च्या साधनांचा वापर करण्याच्या अनुभवाचा अंतर्भाव असलेले प्रात्यक्षिके सादर करून ते शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनं कडून करून घेतले. या कार्यशाळेचे आयोजन माहिती तंत्रज्ञान विभाग व कॉम्पुटर सायन्स आणि डिसाइन या विभागामार्फत करण्यात आले. कार्यशाळेच्या यशश्वीतेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.दिपक विधाते कार्यशाळा शिक्षक समन्वयक प्रा.सौ.पूजा वैकर, प्रा. सौ.पी. एस. डोलारे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विध्यार्थी यांनी केले. या कार्यशाळेसाठी संस्थेचे चेअरमन नामदार डॉ राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, संस्थेचे प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

# करंजी मंडळात फळपिकांचा बोगस विमा; अधिकाऱ्यांची पाहणी : विमा होणार रद्द

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी** : करंजी ता. पाथर्डी येथील करंजी कृषी मंडळाअंतर्गत फळबाग मोठ्या प्रमाणात लागवड झालेली असली तरी फळ पिकाचा विमा उतरवताना सुमारे चारशे शेतकऱ्यांनी फळबागा नसतानाच विमा उतरवला असल्याचे आढळून आले असुन याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे तसा अहवाल सादर करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर असे की पाथर्डी तालुक्यातील करंजी कृषी मंडळ कार्यालया अंतर्गत करंजी,वैजू बाभुळगाव, खांडगाव, जोहारवाडी, चिचोंडी, घाटशिरस, सातवड ,भोसे सह सुमारे २९ गावे येतात. या गावांमध्ये ९३३ शेतकऱ्यांनी फळ पिकविमा भरला होता. त्यामध्ये संत्रा ,मोसंबी ,डाळिंब ,सीताफळ व पेरू अशी फळझाडांचा विमा उतरवला होता. मोठ्या प्रमाणामध्ये फळपीक विमा शेतकऱ्यांनी भरल्यामुळे पिक विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी याबाबत प्रत्यक्ष बांधावर जाऊन याबाबत सर्वे केला. त्यानंतर पुन्हा एकदा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनीही या पिक विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांच्या पाहणी केली त्यावेळी असे आढळून आले की सुमारे ५२७ शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष विमा फळबागा आढळून आल्या तर सुमारे २५० शेतकऱ्यांच्या शेतामध्ये एक फळ बागा नव्हत्या तर काही शेतकऱ्यांच्या फळबागा कमी वयाच्या होत्या. तसेच काही शेतक-यांनी ज्यादा क्षेत्र लावले होते. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये प्रत्यक्ष पाहणी केल्या नंतर फळबागा आढळून आल्या नाहीत ते शेतकरी अपात्र होतात तर ज्या शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षम तथा कमी वयाच्या फळबाग आहेत तेही यामध्ये पात्र होत नाहीत. अशा सुमारे चारशे पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या नोंदी आढळून आल्या आहेत.कांदा पिकाची लागवड नसतानाही अनेक शेतकऱ्यांनी कांद्याच्या पिकाचा विमा उतरवला होता तो प्रकार उघडकीस आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे त्यामुळे प्रशासन काय कार्यवाही करते याकडे लक्ष लागले आहे.



> पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत सहभागी शेतकऱ्यांपैकी काही शेतकऱ्यांकडे प्रत्यक्षात पाहणी केली असता उत्पादनक्षम वयाच्या मर्यादेत फळबागा आढळून आल्या आहेत. या संदर्भात अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर केला आहे.
>
> **- संकेत कराळे**
> (कृषी मंडळ अधिकारी, करंजी)

# बीटस्तरीय स्पर्धेत वेळू शाळेला नेत्रदीपक यश

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**नसरापूर :** पुणे जिल्हा परिषद, पुणे यशवंतराव चव्हाण कला क्रीडा सांस्कृतिक महोत्सव " भोर पंचायत समिती विकास गटातील गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली नसरापूर बीट स्तरीय स्पर्धा न्यू इंग्लिश स्कूल वरवे येथे संपन्न झाले. या बीटस्तरीय स्पर्धेत शिवरे केंद्राने वीस प्रथम क्रमांक मिळवत त्यामध्ये वेळू जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने चमकदार कामगिरी करत सर्वात जास्त ८ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत ८ गोल्ड मेडल मिळवत आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवला आहे.त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे या स्पर्धेमध्ये शिवरे केंद्रात वीस तर नसरापूर केंद्रात १४ तर मोहरी केंद्रात आठ ,जांभळी केंद्रात सहा असे प्रथम क्रमांकाचे गोल्ड मेडल मिळवले आहे,यामधील शिवरे केंद्राने २० तर प्रथम क्रमांकाचे गोल्ड मेडल मिळवलेले आहे त्यामध्ये वेळू जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने आठ तर शिंदेवाडी शाळेने पाच, शिवरे शाळेने पाच व कुसगाव शाळेने एक, खोपी शाळेने एक असे प्रथम क्रमांक या स्पर्धेमध्ये मिळवत गोल्ड मिळवलेले आहे. यामध्ये शिवरे केंद्रातील वेळू जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वैयक्तिक स्पर्धेमध्ये धावणे मोठा गट मध्ये साक्षी नवनाथ शिंदे प्रथम क्रमांक तर बुद्धिबळ मध्ये शिवम अंकुश कोल्हे प्रथम, लांब उडी मध्ये शिवम कोल्हे प्रथम, उंच उडी लहान गट मध्ये स्वराज यादव प्रथम , गोळाफेक मोठा गट मध्ये शुभांगी राठोड प्रथम ,तर या शाळेतील सांघिक स्पर्धेमध्ये प्रथम लोकनृत्यांमध्ये प्रथम लेझीम मध्ये ,छोट्या गटामध्ये प्रथम, लेझीम लहान गटामध्ये प्रथम, कबड्डी मोठा गट द्वितीय असे यश मिळवले आहे, मुख्याध्यापक वैशाली सूर्यवंशी तर लेझीम मार्गदर्शकआदर्श शिक्षिका रूपाली मुजुमले



वृंदावन, लोकनृत्य मार्गदर्शन पठाण जमीन, लतीफ खान, इतर सहकारी मलशेट्टी, व इतर सहकारी शिक्षिका यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी विस्तार अधिकारी राजेंद्र जाधव केंद्रप्रमुख संजय माने उपस्थित होते. या स्पर्धेचे नियोजन समितीमध्ये संदीप दानवले ,पालकर मुख्याध्यापक वैशाली सूर्यवंशी,थोरात व शिक्षक होते.

## द•ख•ल

## पीएमपीएमएलच्या फेऱ्या रद्द, विद्यार्थ्यांची गैरसोय

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**लोणी-धामणी:** मार्ग क्रमांक १५९/ब मनपा ( पुणे ) श्रमिक भवन ते लोणी धामणी (ता.आंबेगाव ) व पाबळ या मार्गावरील सकाळी आठ वाजता आणि दुपारी तीन वाजता अशा दोन्ही वेळेमधील दोन बसच्या सहा सहा फेऱ्या अचानक रद्द करण्यात आल्या. परिणामी शालेय शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी काढलेल्या पासेसचे नुकसान झाले आहे.गावी शेती कामासाठी जाऊन शेती कामे उरकून संध्याकाळी परत पुण्यात येणाऱ्या असंख्य प्रवाशांचे नुकसान झाले आहे.येणारे दिवस यात्रा उत्सवांचे असल्यामुळे लोक गावी कसे जाणार हा विचार न करता पीएमपीएमएलच्या ढिसाळ नियोजनामुळे बस अचानक बंद करण्यात आले आहे. परिणामी असंख्य प्रवाशांचे हाल होत आहे.लोणी,वडगावपीर,धामणी, खडकवाडी,रानमळा,वाळूंजनगर, जारकरवाडी या परिसरातील अनेक विद्यार्थी वाघोली,पूणे या ठिकाणी कॉलेजला जाऊन येऊन करत आहेत.पण बस बंद झाल्यामूळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूकसान होत आहे.याला जबाबदार कोण असा सवाल विद्यार्थीनी केला आहे.बंद करण्यात आलेली बस सेवा त्वरीत सुरू करावी अशी मागणी वडगावपीर गावचे सामाजिक कार्यकर्ते विशाल आदक पाटील, जणकल्याण पतसंस्थेचे संचालक गुलाब फूलमाळी व लोणी येथील व्यावसायिक लौकिक खंडागळे व विद्यार्थ्यांनी केली आहे. जर येत्या आठ दिवसात बंद करण्यात आलेल्या बस फेऱ्या पुन्हा सुरू केल्या नाहित तर तीव्र आंदोलनचा इशारा विद्यार्थ्यांनी दिली आहे

## आवो साई खंडोबा मंदिरात भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिर्डी येथील मार्तड म्हाळसापती आवो साई खंडोबा मंदिरात चंपासष्टी निमित्ताने हजारो भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. चंपासष्टी निमित्ताने आवो साई खंडोबा मंदिरात फुलाची सजावट आकर्षण रोषणाई करण्यात आली होती. याच ठिकाणी म्हाळसापती यांनी साईबाबाची भेट झाली असता आवो साई नावाने हाक मारली होती. त्यामुळे साईबाबा हेच नाव जगात अजरामर झाले जगभरातील साईभक्त पहिल्यादा खंडोबा मंदिरात येऊन दर्शन घेऊन साई मंदिरात जात असतात. त्यामुळे आवो साई खंडोबा मंदिराला मोठे महत्त्व असून या ठिकाणी दर्शन घेतल्यानंतर भाविकांच्या मनोकामना पुर्ण होतात अशी भाविकाची श्रध्दा आहे. परराज्यातील साईभक्त भाविकांसह शिर्डी व पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. वांगे व भाकरी म्हणजे भरीत रोडगा या नैवेद्य दाखवण्यात आला. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी आवो साई खंडोबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संदीप नागरे उपाध्यक्ष अजय नागरे खजिनदार दिपक नागरे व नागरे परिवाराने परिश्रम घेतले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी वांग्याचे भरीत व भाकरीचा महाप्रसाद देण्यात आला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास नृत्या प्रथम क्रमांक

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,पुणे राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्र संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पुणे जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम,युवाकृती व विज्ञान मेळाव्याचे आयोजन दि.५ व ६ डिसेंबर रोजी आझम कॅम्पस येथे करण्यात आले होते. या महाराष्ट्र युवा महोत्सवात बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने समूह लोकनृत्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला व लोकगीत समूह गायनामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. विजेत्या संघांना जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

## प्रश्नमंजुषा स्पर्धेत 'अनेकान्त'चे यश

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** कृषी उद्योग मूल शिक्षण संस्थेचे,वसतिगृह विद्यालय,काऱ्हाटी येथे आयोजित केलेल्या गुणोत्सव २०२४-२५ या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व विविध विषयांतील त्यांची आवड वृद्धिंगत व्हावी या हेतूने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील प्रश्नमंजुषा ही स्पर्धा गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल येथे पार पडली. या स्पर्धेमध्ये अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलमधील इ.३ री व ५ वी या गटाने द्वितीय क्रमांक पटकावला. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे बक्षीसाचे स्वरूप होते. या गटात पावी सोनटक्के,अनुश्री खराडे,श्रीहरी पुराणिक,रनक शहा या विद्यार्थ्यांचा समावेश होता. तसेच याच स्पर्धेमध्ये स्कूलच्या ६ वी ते ८ वी या गटाने प्रथम क्रमांक पटकवला. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे बक्षीसाचे स्वरूप होते. या गटात स्वरा माने, सार्थक गार्डी, अर्णव चव्हाण, तनुश्री झगडे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती, प्राचार्या, उपप्राचार्या सर्व शिक्षक वृंद व पालक यांनी त्यांचे कौतुक केले.

# कोपर्डी प्रकरणातील पीडितेच्या बहिणीच्या लग्नाला मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**निघोज -** देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१६ रोजी कोपर्डी येथे अत्याचारीत घटना घडली होती. या अत्याचारीत घटनेतील मुलीच्या धाकट्या बहीणीच्या विवाहाला मुख्यमंत्री आले होते. हे कुटुंब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्तक घेऊन या कुटुंबाला मोठा आधार त्यांनी दिला होता. या लग्न सोहळ्यास उपस्थित राहून सुद्रीक कुटुंबाला आधार देण्याचे काम त्यांनी आजही केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवार दि.८ डिसेंबर रोजी निघोज येथील जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात झालेल्या वराळ पाटील - सुद्रीक या लग्न सोहळ्यास उपस्थीती लावीत वधू वरांना शुभेच्छा दिल्या. वधूपिता बबन सुद्रीक यांनी दिलेल्या निमंत्रणाचा स्विकार करीत आपण आज या ठिकाणी आलो असून वधू वरांना शुभआशिर्वाद देत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. निघोज येथील बाळासाहेब मळीभाऊ वराळ पाटील यांचे चिरंजीव अमरदीप व श्रीगोंदा येथील बबन बापूराव सुद्रीक यांची कन्या सपना यांचा शुभविवाह रविवार दि.८ रोजी अडीच वाजता आयोजित केला होता. या शुभविवाह साठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुपारी तीन वाजता टाकळी हाजी येथील

> **" लग्न समारंभ सुरू असताना मंगलाष्टक सुरु होते यावेळी मुंबई बँकेचे चेअरमन आमदार प्रविण दरेकर यांनी माईक हाती घेऊन मंगलाष्टक म्हटले यावेळी उपस्थीतांनी टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक केले. "**

बापूसाहेब गावडे महाविद्यालयाच्या प्रांगणात हेलीकॅपटरने आले यावेळी माजी मंत्री प्रा. राम शिंदे, माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, माजी आमदार पोपटराव गावडे, भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदिप वळसे पाटील, आबा पाटील, युवा नेते राजेंद्र गावडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, सतिष सुद्रीक यांनी त्यांचे स्वागत केले यावेळी फडणवीस यांचे समवेत मुंबई बँकेचे चेअरमन आमदार प्रविण दरेकर




निघोज परिसरातील वराळ पाटील - सुद्रीक लग्न समारंभास उपस्थित राहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुभआशिर्वाद दिले.

होते. साधारण सव्वा तीन वाजता जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात असलेल्या मंगल कार्यालयात ते आले यावेळी वराळ पाटील - सुद्रीक कुटुंबाच्या वतीने त्यांचा बबन सुद्रीक, सतिष सुद्रीक, बाळासाहेब वराळ पाटील, विलास वराळ पाटील यशवंतराव वराळ पाटील, कॅप्टन विठ्ठलराव वराळ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुद्रीक कुटुंबाची आस्थेने चौकशी केली. यावेळी भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, शिवाजीराव खिलारी, राळेगण थेरपाळ सरपंच पंकज कारखीले , निघोजआदी तसेच पुणे व नगर जिल्ह्यातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुंबई बँकेचे अधिकारी व प्रसिद्ध सुत्रसंचालक लहू साबळे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## श्री कातोबा हायस्कूल येथे महापरिनिर्वाण दिन

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**दिवे प्रतिनिधी:** दिवे येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित श्री कातोबा हायस्कूल दिवे या शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी व्याख्याते ज्येष्ठ साहित्यिक सतीश कुमदाळे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची



माहिती देऊन भारताच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्षेत्रातील बाबासाहेबांचे योगदानाचे महत्त्व सांगून त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास करावा असे आवाहन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दादासाहेब साठे यांनी केले. यावेळी विजया चव्हाण, मोनिका कुंभार, रुबाब मुजावर, विद्या शेंडकर, कोमल वडणे, प्रणाली ढुमे, नागनाथ गीते, प्रसाद गोंधळे, राजेंद्र झाडे, किशन विरासे व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता काळभोर यांनी केले तर आभार सुरेखा चव्हाण यांनी मानले.

# वनपुरीच्या भैरवनाथ विद्यालयात विद्यार्थ्यांच्या बाजाराला प्रचंड प्रतिसाद

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** पुरंदर तालुक्यातील वनपुरी येथील श्री भैरवनाथ विद्यालयात शनिवारी सकाळी विद्यार्थ्यांनी आठवडे बाजार भरविला होता. सकाळी ८ ते १० या वेळात बाजार भरविला होता. केवळ दोन तासांत दहा हजार पेक्षा जास्त रकमेची उलाढाल झाली. पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मच्छिंद्र कुंभारकर यांच्या सह विद्यालयातील शिक्षक तसेच पालकांनी उपस्थित राहून वस्तू खरेदी केल्या. या शैक्षणिक वर्षात प्रथमच अशा प्रकारचा बाजार भरविला होता. त्यास प्रचंड प्रतिसाद दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून आनंद वाहत होता.




वनपुरीच्या श्री भैरवनाथ विद्यालयात भरविलेल्या बाजारात वस्तू खरेदी करताना पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मच्छिंद्र कुंभारकर, मुख्याध्यपिका लता बोकड आणि उपस्थित.

शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण वर्षभर सुरूच असते. त्याच बरोबर त्याच्या ज्ञानात भर पडून समाजातील व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी शिक्षक वेगवेगळे उपक्रम राबविण्याचा प्रायत्न करीत असतात. त्यातून त्यांना आपल्या कौटुंबिक परिस्थिती बरोबरच आर्थिक, व्यावहारिक, सामाजिक आदी गोष्टींची जाणीव होण्यास मदत होत असते. याच दृष्टीकोनातून वनपुरीच्या श्रीभैरवनाथ विद्यालयाच्या मुख्याध्यपिका लता बोकड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात आठवडे बाजार भरविण्याची संकल्पना मांडली. सहशिक्षिका अनिता खेसे यांच्यासह क्रीडाशिक्षक जनार्धन कांबळे, दत्तात्रय सणस, सुरेश गोरे, सुहास वाघमारे, दत्तात्रय रोकडे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुर्यकांत काळे, सहशिक्षिका संगीता कुदळ, तसेच संदीप इंदलकर तसेच संदीप इंदलकर, कैलास कुंजीर आदींनी यास सकारात्मकता दाखवली. शनिवारी सकाळी ८ ते १० यावेळेत प्रत्यक्षात बाजार सुरु झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनी शेतातील कांदे, टोमाटो, मेथी, कोथंबीर, पालक, तांदुळजा, वांगी अशा प्रकारची विविध तरकारी पिके, शेवंती, गुलाब, झेंडू अशा प्रकारची फुले त्याच बरोबर खवय्यांच्या यादीत प्रथम स्थान असलेली प्रसिद्ध भेळ, कांदे पोहे, व्हेज पुलाव, उपमा, चहा आदी प्रकारची खाद्य पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. अंजीर, पेरू, थंड पेये, लिंबू सरबत हेही ठेवण्यात आले होते. त्यात लक्षवेधी म्हणजे काही विद्यार्थ्यांनी तीन दगडांची चूल तयार करून त्यावर चुलीवर गरमागरम म्यागीची जोरदार विक्री केली. स्वराज कुंभारकर, सक्षम काळे, सार्थक कुंभारकर, यशराज मगर यांनी भेळ विक्रीतून तब्बल १६०० रुपये मिळविले. सई हगवणे, संस्कृती कुंभारकर, श्रावणी कुंभारकर, वैष्णवी कुंभारकर यांनी ओली भेळ मधून १३६० रुपये मिळविले. लक्षराज शितोळे, ऋषिकेश गायकवाड, आयुष्य कोलते, यांनी म्यागी व चहा विक्रीतून १६७० रुपये मिळविले. स्वरा बोरकर हिने पुलाव विक्रीतून ५८० रुपये मिळविले. ईश्वरी कुंभारकर, परिणीता हगवणे, आर्या हगवणे यांनी फळ विक्रीतून ५०० रुपये त्याचबरोबर पाणीपुरी आणि इतर वस्तूंच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शेकडो रुपयांचा व्यवसाय केला. त्यामुळे केवळ दोन तासांत दहा हजार पेक्षा जास्त रुपयांची उलाढाल झाली.

# खंडोबा मंदिरातील चंपाषष्ठी त्रिदिनात्मक सोहळ्याची टोका प्रवरासंगम येथे सांगता

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** चंपाषष्ठी यात्रा उत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील टोका-प्रवरासंगम येथील खंडोबा मंदिरात आयोजित त्रिदिनात्मक सोहळयाची रविवारी दि.८ डिसेंबर रोजी गंगापूर तालुक्यातील लखमापूर येथील रामकृष्ण भक्तीधाम आश्रमाचे प्रमुख योगीराज हभप दादाजी महाराज वायसळ यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता करण्यात आली. कर्माचे रूपांतर भक्तीत होण्यासाठी भगवंताचे नामस्मरण हाच पर्याय असून अंतःकरणापासून देवाची भक्ती करा असे आवाहन हभप दादाजी महाराज वायसळ यांनी यावेळी बोलतांना केले.



(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

यावेळी झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलतांना योगीराज हभप दादाजी महाराज वायसळ म्हणाले की अंतःकरणापासून केलेली भक्ती भगवंतांच्या चरणाजवळ जाते,भक्तीत लीनता असावी,गर्वाने व अहंकाराने कधी ही भक्ती करू नका,प्रसादाचे महत्व विषद करतांना ते पुढे म्हणाले की देवाचा प्रसाद घेतांना लाज व संकोच बाळगू नका, प्रसादाला निमंत्रणाची गरज नसते, न बोलवता धर्म कार्यात होणाऱ्या महाप्रसाद कार्यक्रमात जात जा, देवाचा प्रसाद जीवनामध्ये फळ प्राप्त करून देतो, जीवनातील दुःखाचा नायनाट करण्यासाठी श्रद्धेने व निष्ठेने प्रसादाचे सेवन करा, भगवंतांच्या नामात मोठी ताकद असून संसार प्रपंचात काम करत असतांना भगवंतांची आठवण ठेवा, नामस्मरणाद्रे भगवंतांचे चिंतन करा असे आवाहन केले.

यावेळी झालेल्या किर्तन प्रसंगी सोहळयात अन्नदान करणारे दाते जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दादासाहेब शेळके,योगेश औटी,माजी सरपंच सुनीलराव बाकलीवाल, कैलास झगरे यांचा श्रीफळ प्रसाद देऊन गौरव करण्यात आला.या प्रसंगी गायनाचार्य लक्ष्मण महाराज पाचपुते, ऋषिकेश महाराज वाल्हेकर,निलेश महाराज कान्हे, संतसेवक गजानन चव्हाण,जय मल्हार मित्र मंडळाचे कैलासभाऊ खंडागळे,बंटी खंडागळे,सुनील खंडागळे, बाबासाहेब खंडागळे, मेजर संतोष खंडागळे, शांतवन खंडागळे,योगेश औटी भानुदास खंडागळे, बाळासाहेब खंडागळे, भाऊसाहेब खंडागळे,दिलीप खंडागळे,विजय खंडागळे, संजय खंडागळे,राजेंद्र खंडागळे व जय मल्हार मित्र मंडळाचे सदस्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# संत ज्ञानेश्वर माऊली समाधीवर प्रक्षाळपूजा उत्साहात संपन्न



**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७२८वा समाधी सोहळा नुकताच मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. कार्तिकी यात्रेमध्ये लाखो भाविकांनी संत ज्ञानेश्वर समाधीचे दर्शन घेतले. त्यानिमित्ताने शिणवटा काढण्यासाठी कार्तिकी यात्रेनंतर प्रक्षाळपूजा करण्याची परंपरा आहे. माऊलींच्या समाधीवर गरम पाणी व दह्यादुधाने स्नान घालण्यात आले आणि आयुर्वेदिक काढाही देण्यात आला. देवाचा शिणवटा काढण्यासाठी कित्येक वर्षांपासून ही प्रक्षाळ पूजा परंपरा सुरू आहे. यासाठी आज सकाळी ११ वाजेपर्यंत दर्शनाला येणारे भाविक लिंबू आणि साखर समाधीला चोळून दर्शन घेत होते. संत ज्ञानेश्वर संजीवन समाधीवर भाविकांच्या वतीने अभिषेक आळंदी देवस्थानने बंद केल्याने फक्त माऊलींचे दर्शन घेतले जायचे माऊलींना पाणी घालवे व अभिषेक केला जावा अशी इच्छा अनेक भाविकांची असते ती इच्छा आज प्रक्षाळ पूजाने परीपुर्ण झाली देवस्थानच्या वतीने यावेळी योग्य नियोजन केल्याने अधिकाधिक भाविकांना व आळंदीकर ग्रामस्थांना प्रक्षाळपूजाचा लाभा घेतला असल्याचे मंदीर समितीचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी सांगितले आहे.

# बारामतीच्या बाजारात समीतीत रेशीम कोषला उच्चांकी भाव

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे रेशीम कोष मार्केट मध्ये ४ नोव्हेंबर रोजी रुपये ७२५ प्रति किलो असा उच्चांकी दर मिळाला. बारामती बाजार समितीचे रेशीम मार्केट हे ऑनलाईन मार्केट असल्याने महाराष्ट्र राज्यातील तसेच कर्नाटक, तामिळनाडु, पश्चिम बंगाल या राज्यातील खरेदीदार यामध्ये सहभागी होत आहेत. त्यामुळे कोषास चांगला दर मिळत आहे. रेशीम कोषास वाढत असलेल्या दरामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात तुती लागवडीकडे वळत आहे. बारामती मध्ये पारदर्शक व्यवहार, कोषाचे इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर अचुक वजन, ऑनलाईन पेमेंट, कुठलीही कडती नाही. यामुळे रेशीम कोष उत्पादक शेतक-यांनी आपला कोष बारामती रेशीम कोष मार्केट मध्येच विक्रीस आणावा असे आवाहन बारामती बाजार समितीचे सभापती सुनिल पवार व उपसभपाती निलेश लडकत यांनी



केले आहे. बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीने समिती मार्फत कोष खरेदीसाठी व्यापा-यांना तसेच रिलर्स यांना लायसेन्स दिले असल्याने महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यातील लासन्सधारक खरेदीदार ऑनलाईन कोष खरेदी करीत आहेत. रेशीम मार्केट मध्ये आज एकुण ५४० किलो कोषाची आवक होऊन किमान रू. ५९० तर सरासरी रू. ६९० असा दर मिळाला आहे. काळुराम हरिभाऊ घाडगे आणि प्रमोद दादाभाऊ घाडगे (रा. दावडी ता:खेड जि. पुणे) या रेशीम कोष उत्पादक शेतक-यांच्या कोषास जादा दर मिळाला आहे. सन २०२२ पासुन रेशीम मार्केट सुरू झाले पासुन आत्तापर्यन्त ७ कोटी रूपयांची उलाढाल झाली असुन एकुण १६० टन कोष विक्री झाली आहे. बारामतीसह पुणे, सोलापुर, अमहदनगर, सातारा या जिल्हयातुन शेतकरी कोष घेऊन येत असुन जादा दर मिळत असल्याने शेतकरी समाधानी असल्याची माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली.

# महिलांनी आई-वडील व सासू-सासरे यांचा आदर करावा:न्या.एम.एस.शेख

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** महिला सक्षमीकरण या अंतर्गत महिलावर जर अन्याय झाला तर महिलाच पुरुषाला घराबाहेर काढू शकते. पण कपाळावर जी टिकली लावलेली असते. त्याचे खूप महत्त्व असते. अन्यथा एकल महिला कडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन खूप वेगळा असतो. त्यामुळे स्त्रीमध्ये पुरुषाचा जीव सुद्धा माघारी खेचून आणण्याची ताकद असते. पण तरीही महिलांनीही आपले आई वडील व सासू सासरे यांची इज्जत केली पाहिजे. त्यांची फार अपेक्षा नसते. त्यांना फक्त दोन वेळचे जेवण गरजेचे असते असे प्रतिपादन जिल्हा एम .एस. शेख यांनी केले.आज ग्रामीण विकास केंद्र आणि करो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कौटुंबिक हिंसाचाराविरोधी पंधरवाडा जनजागृती अभियान समारोप कार्यक्रम आज आज लिंपणगाव येथे पार पडला या कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हा न्यायाधीश एम एस शेख हे उपस्थित होते, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच शोभाताई कोकाटे होत्या .न्या. मुजीब शेख म्हणाले की, लेकरावर संस्कार करा. कमीत कमी महिन्यातून एकदा शाळांमध्ये कॉलेजमध्ये जाऊन मुलांची चौकशी करा. मुलांना महापुरुषांचे विचार कळू द्या; तरच पुढील पिढी व्यवस्थित घडेल. आई वडीलच आपल्या मुलांना मोबाईल ,टू व्हीलर गाड्या देऊन बिघडवत आहेत असे देखील न्या. शेख यांनी यावेळी सांगितले. ग्रामीण विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अँड. अरुण जाधव म्हणाले की माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी आजही ७५ वर्षानंतर मिळालेले नाही आजही आपण रेशन कार्ड साठीच भांडत आहोत हे फार दुर्दैवी आहे. कार्यक्रमासाठी गटविकास अधिकारी राणीताई फराटे, पोलीस स्टेशनचे पीएसआय अहिरे, श्रीगोंदा तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार मुगदुल , श्रीगोंदा पंचायत समितीच्या समन्वयक अनिता काळे , ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर; लिंपणगावचे उपसरपंच कृष्णा रोडे, ग्रामपंचायत माजी सरपंच व विद्यमान सदस्य अरविंद कुरुमकर , महिला सक्षमीकरण चे पल्लवी शेलार -टिम लीडर,लता सावंत, उज्वला मदने ,रोहिणी राऊत, शितल रंधवे, संतोष भोसले, अशोक मोरे, दिक्षेना पवार, काजरी पवार,गणेश पोळ, नर्सिंग भोसले, मुमताज मुलानी, सारिका गोंडे, दरकष काळे, व तसंच एम एस डब्ल्यू स्टाफ, आदींसह महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन लता सावंत यांनी केले तर आभार पत्रकार पल्लवी शेलार यांनी मानले.



## द•ख•ल

### महेश्वरी टेक्निकल कॉलेजमध्ये डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्रीरामपूर येथील महेश्वरी टेक्निकल कॉलेजमध्ये अभिवादन करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून महेश्वरी टेक्निकल कॉलेजमध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शेखर जोशी उपस्थित होते. जोशी यांनी आपल्या मनोगतात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर दृष्टीक्षेप टाकत त्यांचे आचार विचार आणि चरीत्र संपूर्ण समाजाला प्रेरणादायी, बोध घेण्यासारखे असून तसे आचरण करणे हेच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन ठरेल असे मत व्यक्त केले. या प्रसंगी थोरे मॅडम, हुसेन पठाण , योगेश शेलार , विनायक थोरे , लिंगे मॅडम, हिना शेख , प्रतिक्षा सावंत आदि शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हिना शेख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रतिक्षा सावंत यांनी आभार प्रदर्शन केले.

### उद्या राष्ट्रीय श्रीराम संघाचा तहसीलवर मोर्चा



**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:-** बांगला देशातील अल्पसंख्याक हिंदुवर होत असलेल्या अन्याय, अत्याचारा विरोधात आणि तेथील हिंदूंच्या मागे भारतीय हिंदू खंबीरपणे उभे असल्याचा संदेश देण्यासाठी व शासनाने आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य भूमिका घेऊन हिंदू हिताचे पाऊल उचलावे म्हणून मंगळवार दि.१० रोजी मानवाधिकार दिनी हजारोंच्या संख्येने भव्य मोर्चाने जाऊन तहसीलदारांना निवेदन देण्यासाठी हिंदूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सकल हिंदू समाज महाराष्ट्रच्या वतीने राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांनी केले आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सागर बेग यांनी म्हंटले आहे की,हिंदू समाज बांधवांवर आजपर्यंत सतत अन्याय अत्याचार होत आलेले आहेत.त्यावर कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांनी याअगोदर आवाज उठवलेला नाही तर मानवाधिकार या आंतरराष्ट्रीय संघटनेनेही त्याची साधी कधी दखलही घेतलेली नाही. परंतु विशिष्ठ समाजाच्या लोकांवर झालेल्या किरकोळ अन्यायाच्या बाजूने मानवाधिकार संघटनेने आवाज उठवून हिंदूंवर एकप्रकारे अन्यायच केलेला आहे.हिंदूवरील अन्यायाविरोधात तेथीलच सन्यासी चिन्मय दास स्वामींनी निषेध नोंदवला म्हणून त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवून त्यांना तुरुंगात टाकण्यात आले या गंभीर घटनेचा भारत सरकारने निषेध सुद्धा नोंदवलेला आहे.तेथील नागरी सुरक्षेसाठी असणाऱ्या राज्य संस्था देखील हिंदूंवरील अत्याचारास पाठबळ देत असल्याचे सिद्ध झालेले असून तो चिंतेचा विष्य आहे. भारतात छोट्या मोठ्या घटनांवर आकांडतांडव करणारे आज बांगला देशातील अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचार अन्यायाबाबत गप आहेत ही खूप मोठी शोकांतिका आहे. मानवाधिकार दिनी संपूर्ण महाराष्ट्रात दि.८ व १० रोजी दोन टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यामध्ये मोठ्या संख्येने हिंदू एकत्र येऊन शासनाला निवेदन देणार आहेत.त्यातलाच एक भाग म्हणून मंगळवार दि.१० रोजी श्रीरामपूर तालक्यातील हिंदूंनी मोठ्या संख्येने येऊन शांततेच्या मार्गाने जाऊन श्रीरामपूर तहसीलदार यांना निवेदन देऊन शासलाना बांगला देशात हिंदूंवर होणारे अन्याय थांबण्याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगवान हलचाली करून प्रयत्न करणेबाबत विनंती करण्यात येणार आहे असे निवेदनात बेग यांनी शेवटी म्हंटले आहे.

### तिर्थक्षेत्र समीतीवर नियुक्ती झाल्याने कासलीवाल यांचा सन्मान

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** जैन समाजातील धार्मिक व सामाजिक कार्यात नेहमीच मोठे योगदान देणारे कोपरगाव शहरातील विजय बी कासलीवाल यांच्या कार्याची दखल घेऊन त्याची भारत वर्षीय दिगंबर जैन तिर्थक्षेत्र कमिटीच्या महाराष्ट्राच्या मिडिया प्रभारीपदी नुकतीच निवड करण्यात आली. या बद्दल राष्ट्रसंत नमोकार तिर्थ प्रणेते देवनंदी महाराज यांच्या उपस्थितीत कोपरगाव दिगंबर जैन समाजाच्या उपस्थित पंच आनंद काले मोहीत गंगवाल आजित लोहाडे यांच्या उपस्थितीत गुलाबपुष्प शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जैन समाजातील धार्मिक सामाजिक सांस्कृतिक कामाची चांगली माहिती समाज घटकापर्यंत पोहचवण्यासाठी प्रामाणिकपणे केलेले काम ही देखील एक चागल्या प्रकारची सेवा असल्याची भावना व्यक्त केली. या प्रसंगी विजय कासलीवाल म्हणाले, मिळालेली संधी आपल्या कामाचा सन्मान असुन यापुढील काळात देखील आपण निस्वार्थ भावनेने काम करणार असल्याचे मत व्यक्त केले.




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर भविष्यवेधी राष्ट्रपुरुष : प्रा. जाधव




**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**


**लिंपणगाव-** "महापरिनिर्वाण" हा शब्द बौद्ध तत्त्वज्ञानातून उलगडला गेला आहे जो मृत्यूनंतर प्राप्त होणाऱ्या निर्वाण स्थितीचे प्रतिनिधित्व करतो. बौद्ध धर्मात, महापरिनिर्वाण ही मृत्यू, दुःख आणि जन्मापासून मुक्तीची अंतिम अवस्था आहे. शब्द. "परिनिर्वाण" बुद्धाच्या प्रस्थानाचे वर्णन करते. डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनपटातील महत्त्वाच्या घटना सांगताना विद्यालयाचे इंग्रजी अध्यापक बापू जाधव यांनी डॉ. आंबेडकरांना जातीच्या चष्म्यातून न पाहता समग्र देशासाठी कार्य करणार अष्टपैलू व्यासंगी व्यक्तिमत्व असलेले महापुरुष या भूमिकेतून पाहिले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी स्कूल कमिटी सदस्य रवीशेठ दंडनाईक, प्राचार्य दिलीप भुजबळ, पर्यवेक्षक भाऊसाहेब गदादे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकवृंद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी इ. ६ वी अ मधील प्रतिक क्षीरसागर,समर्थ राऊत,अरबाज शेख,आयान शेख,शेखर मखरे आपल्या मनोगतातून अभिवादन केले. सुमित जेधे याने डॉ.आंबेडकर यांच्या जीवनावर स्वरचित कवितेचे गायन केले.यश उदमले,वेदांत निसळ यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उलगडून दाखवला. या कार्यक्रमाचे नियोजन सिमा जगताप व माधुरी सरोदे तसेच इ.६ वी अ विद्यार्थी यांनी केले.

# बेपत्ता मिठूभाई शेख यांचा मृतदेह आढळला

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:** काँग्रेस पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष मिठूभाई शेख यांच्या छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह आज सकाळी शेवगाव रोड लगत असलेल्या खेर्डा फाटा येथील शेतात आढळून आला.गेल्या काही दिवसांपासून ते बेपत्ता होते.शेख हे तीस वर्ष तालुक्याच्या राजकारणात सक्रिय होते. त्यांच्या राजकारणाची सुरवात माजी केंद्रीयमंत्री स्व. बबनराव ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली झाली.बबनराव ढाकणे यांनी सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळाव्या या मागणीसाठी केलेल्या आंदोलनात ते सक्रिय होते.या काळात त्यांना अटक होऊन काही दिवस ते विसापूरच्या जेल मध्ये राहिले होते.आपल्या नर्मविनोदी भाषणशैलीने त्यांनी अनेक सभा गाजवल्या.काळाच्या ओघात त्यांनी माजी आमदार अप्पासाहेब राजळे तर त्या नंतर स्व. राजीव राजळे यांच्या नेतृत्वाखाली काम केले. तत्कालीन काँग्रेसचे नेते स्व.विलासराव देशमुख,यशवंतराव गडाख,स्व.भाऊसाहेब थोरात तसेच माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता.स्व.राजीव राजळे यांनी स्व.राजीव गांधी यांचे छायाचित्र असलेले कॅलेंडर प्रकशित केल्या नंतर शेख यांनी दिल्ली गाठत त्या कॅलेंडरचे प्रकाशन सोनिया गांधी यांच्या हस्ते केले होते.अजमेर येथील शरीफ दर्ग्यावर त्यांची मोठी श्रद्धा होती. अजमेरला जाताना ते आपल्या समवेत अनेक तरुणांना घेऊन जायचे."जाने वाले कभी नहीं आते...जाने वाले की याद आती है...." हा शेर त्यांचा फेमस होता. पाथर्डी ग्रामपंचायतीचे सदस्य,पाथर्डी गावाचे सरपंच पदही त्यांनी भूषवले होते तर पाथर्डी पालिकेच्या पहिल्या निवडणुकीत ते नगरसेवक म्हणूनही निवडून आले होते.२५ नोव्हेम्बरला त्यांच्या नातेवाईकांनी ते बेपत्ता झाल्याची खबर पोलीस स्टेशनला दाखल केली होती. आज त्यांचा मृतदेह खर्डा फाटा येथे आढळून आल्याचे समजताच अनेकांनी त्या ठिकाणी धाव घेतली तर घटनास्थळी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे,उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर,पोलीस हेडकॉन्स्टेबल अभयसिंग लबडे,पोलीस कॉन्स्टेबल राम सोनवणे,इजाज सय्यद,संजय जाधव हे दाखल झाले व त्यांनी शेख यांच्या कुटुंबियांना बोलावून घेत त्यांच्या मृतदेहाची ओळख पटवली. पोलिसांनी शेवगाव रोड च्या काही दुकानातील सीसीटिव्ही फुटेज तपासले असता त्याच्या अंगावर असलेल्या कपड्यावरून व पायातील चपलावरून हा शेख यांचा मृतदेह असल्याची खात्री पटली.आज सायंकाळी शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले तर त्यांचे काही अवशेष डीएनए तपासणीसाठी नाशिक ला पाठवले असल्याची माहिती तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर यांनी दिली.



# जलसंधारण कामांमुळे करंजीतील फळबागा बहरल्या

> एरवी पावसाळ्यानंतर दोन ते तीन महिन्यात विहिरींचे पाणी अटत असे. यावर्षी मात्र विहिरींना चांगल्या प्रमाणात पाणी असल्याने फळबागांना पुरेसे पाणी मिळते आहे. पाण्यामुळे इतरही परिसर बहरला आहे. गावात असणाऱ्या प्रत्येक बंधाऱ्यातील गाळ काढण्यासोबत जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत विविध कामे घ्यायची आहेत.
>
> **रफिक शेख, ग्रामस्थ**



**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** - पाथर्डी तालुक्यातील करंजी गावात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत जलसंधारणाची विविध कामे केल्याने शाश्वत जलसाठा उपलब्ध झाला असून फळबागांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे.करंजी हे बाजारपेठेचे गाव म्हणून ओळखले जाते. दिवसभरात दहा ते पंधरा हजार प्रवासी गावात ये-जा करतात. त्यामुळे गावकऱ्यांसोबत या प्रवाशांसाठीदेखील पिण्याचे पाणी आवश्यक असते. गावात फळबागांचे प्रमाणही अधिक अर्थात एकूण पिकांच्या ७५ टक्के आहे. या फळबागांसाठीदेखील मुबलक प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. पाण्याचे योग्य नियोजन करण्यासोबत पाणीसाठ्यात वाढ करण्याची आवश्यकता लक्षात घेवून गावाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योनजेअंतर्गत जलसंवर्धनाची विविध कामे हाती घेतली. जलस्रोतांमधील गाळ मोठ्या प्रमाणात काढण्यात आला आणि आवश्यक तिथे दुरूस्तीची कामे करण्यात आली. गाळ काढून परिसरातील शेतात टाकण्यात आल्याने शेतीसाठी त्याचा फायदा झाला.गावात पाणलोट विकास समितीमार्फत ४ ठिकाणी सिमेंट नाला बांध दुरुस्ती आणि १९ सामुहीक शेततलावाची कामे घेण्यात आली. याशिवाय ३ मातीनाला बांध, ८ चेक डॅम, समतल चर, संयुक्त गॅबियन, सलग समतल चर अशी ३९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांवर १ कोटी ३४ लाख रुपये खर्च करण्यात आले. या सर्व कामांमुळे गावातील पाणीसाठा वाढण्यास मदत झाली. गावाला आता पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही. पिण्यासाठी आणि सिंचनासाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आहे. एवढ्यावर समाधान न मानता जलसंधारणाची आणखी कामे घेण्याचा ग्रामस्थांचा निर्धार आहे. एकूणच गावात जलसंवर्धनाचे नवे पर्व सुरू झाले आहे.

# संविधानाची निर्मिती बाबासाहेबांनी केली : प्रा.चेमटे

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :**-डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आयुष्यभर अडचणींना सामोरे जावे लागले. जगातील सर्वात मोठ्या संविधानाची निर्मिती त्यांनी केली. त्यांनी तरुणांना 'शिका, संघटित व्हा' व संघर्ष करा,हा मंत्र दिला. त्यांनी वेदांचाही अभ्यास केला होता वैदिक काळामध्ये स्त्रीला जे महत्त्व होतं ते प्राप्त करून द्यायचं हे मनोमन ठरवलं होतं त्यासाठी महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानून त्यांना अभ्यासलं होतं. परंतु आज आपण पाहतो या महान लोकांना जाती-जातीत वाटून घेतलं गेलंय.... त्यामुळे त्यांची उंची, महत्त्व कमी होताना जाणवते असे प्रतिपादन प्राचार्य संजय




छाया: दिपक खोसे, ढोरजळगांव

चेमटे यांनी बोलताना केले. श्रीराम विद्यालय, ढोरजळगाव येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव, क्रांतीसुर्य, भारतरत्न, विश्वरत्न, ज्ञानाचा अथांग सागर असलेल्या डॉ. बाबासाहेब तथा भिमराव रामजी आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन विद्यालयात साजरा करण्यात आला या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये कु. गिरीजा देशमुख, शुभम फुलमाळी, कु.तेजस्विनी ढोले, कु.उकिर्डे गोपिका, कु. कार्तिकी गिऱ्हे, कु.सिद्धांत खाडे, कु. पल्लवी ढाकणे, कु.निकिता गिऱ्हे, कु. भाग्यश्री घाडगे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक पांडुरंग व्यवहारे म्हणाले की बौद्ध धर्मात जी दहा तत्वे दिली आहेत त्यांचे पालन जी व्यक्ती करते त्यांना बोधिसत्व म्हटले जाते व त्या व्यक्तीच्या मृत्यूला महापरिनिर्वाण म्हटले जाते. बाबासाहेब ६७ विषयांमध्ये तज्ज्ञ होते व त्यांना नऊ भाषा अवगत होत्या. ते अस्खलित संस्कृत मध्ये संभाषण करत. त्यांचे गुण, कष्ट, परिश्रम, त्याग खूप मोठा आहे. त्यांना परदेशी शिक्षण घेण्यासाठी बडोद्याचे महाराज सयाजी गायकवाड तसेच कोल्हापूरचे शाहू महाराज यांनी खूप मदत केली. हे सर्व त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक सुनील जायभाये, शंकर खोले, राम काटे, पांडुरंग व्यवहारे, कल्याण राऊत,सुमित म्हस्के, अशोक जाधव, श्रीमती सरला दिवटे, विमल पवार, कविता लोखंडे, कोमल केदार, स्वाती गरड, संतोष अकोलकर, कृष्णा तांदळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती कविता लोखंडे यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु आकांक्षा कोल्हे हिने केले .

# जमीन महसूल अधिनियमाचे उल्लंघन केल्याने उद्या शेतकऱ्यांचे उपोषण

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव** - पाथर्डी तालुक्यातील हनुमान टाकळी येथील शेतकरी सोमनाथ रंगनाथ भगत जमीन महसुल अधिनियम १९६६ व मुदत अधिनियम १९६३ उल्लंघन निषेधार्थ तहसिल कार्यालय पाथर्डी येथे उद्या दि.१० डिसेंबर रोजी आमरण उपोषण करणार आहे, याबाबत तहसिलदार पोलिस स्टेशनला निवेदन दिले आहे. त्यांनी निवेदनात सांगितले की, आई हौसाबाई रंगनाथ भगत वय ५० व बंधु साईनाथ रंगनाथ भगत वय ३०हे राहत असुन वडील रंगनाथ लक्ष्मण भगत हे मयत आहेत. यांच्या मरणोत्तर आमची कोपरे, ता. पाथर्डी जि. अ.नगर, येथे गट नंबर १४/२/२ या ठिकाणी असणारी जमीनीत येणाऱ्या पिकांच्या उत्पन्नावर आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालु आहे, असे असताना आमच्या शेजारील गटातील सर्व खातेदारांनी सहमतीने कोविड महामारी साथीचा रोग -१९ च्या महाराष्ट्र शासन जिल्हा बंदी व जमावबंदी आदेशाचा गैरफायदा येत सहमतीने, संगनमताने गेली तीन वर्षांपासून जमिनीत येण्यास प्रतिबंध करत आमची आई व बंधु याच्या मानवी हक्क व भारतीय राज्यघटनेच्या कायदेशीर हक्कांचे उल्लंघन करत मानसिक व आर्थिक त्रास देत आत्महत्या करण्यासाठी मला माझ्या कुटुंबाला जाणीवपूर्वक प्रयत्न चालवले आहेत. याची प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली.परंतु योग्य ती दखल घेतली नाही. जमिनीतील बांध त्यांच्या गटांतील भावकी व इतरांनी दि.२४/११/२०२४ रोजी रात्री जमिन महसूल अधिनियम कायद्याचे उल्लंघन करत खणून टाकल्याचे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे या बांधाची रात्री चोरी झाली असल्याने त्यांनी तसे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक अहील्यानगर व तहसीलदार पाथर्डी यांना खनलेला बांध शोध घेऊन पूर्ववत करुन गटांतील सर्व बाजूच्या शेजाऱ्यांकडून कायद्याचे उल्लंघन करत अशा बेकायदेशीर कृत्याला आळा बसावा यासाठी आमरण उपोषण करणार असल्याचे प्रशासनाला कळवले आहे.

# महाविद्यालयाच्या सहलीची बस नादुरुस्त

## शिक्षक व पोलिसांच्या मदतीने विद्यार्थी सुखरूप पोहचले !

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

श्रीगोंदा ;- श्रीगोंदा शहरातील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या जुनियर कॉलेजतर्फे आयोजित सहल ३ डिसेंबर रोजी एकविरा देवी, कार्ला लेणी, महड गणपती, पाली, अलिबाग या मार्गाने नियोजित होती. परंतु खंडाळा घाटाच्या टोकावर अचानक बसचा एअर पाईप फुटल्याने गाडी बंद पडली. रात्रीच्या अंधारात घडलेल्या या घटनेत, गाडीतील ३८ विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना महामार्ग पोलिसांनी प्रसंगावधान राखत सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. त्यामुळे श्रीगोंदा आगाराच्या कामकाजाविषयी मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होताना दिसत आहे.

श्रीगोंदा शहरातील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या जुनियर कॉलेजतर्फे आयोजित सहल ३ डिसेंबर रोजी एकविरा देवी, कार्ला लेणी, महड गणपती, पाली, अलिबाग लोणावळा या मार्गाने नियोजित होती.सहलीसाठी तीन बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. ज्यात १४४ विद्यार्थी/विद्यार्थिनी व शिक्षक प्रवास करत होते. खंडाळा घाटाच्या टोकावर रात्री ८.३० च्या सुमारास एका बसचा एअर पाईप फुटल्याने गाडी अचानक बंद पडली. यावेळी सोबत शिक्षकांनी विध्यार्थ्यांना सोबत घेऊन पोलिसांची मदत घेऊन काही अंतर चालत जाऊन मग नादुरुस्त बसमधील मुले इतर बसमध्ये बसवून लोणावळा येथील मुक्काम ठिकाण घाटले आणि सर्वांनी सुटकेचा विस्वास टाकला. त्या वेळी उपस्थित शिक्षकांनी हायवे पोलीस, खंडाळा पोलीस निरीक्षक, तसेच श्रीगोंदा आगार व्यवस्थापक यांच्याशी तत्काळ संपर्क साधला. स्थानिक प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप करत घटनास्थळी दाखल होऊन सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना सुरक्षित स्थळी हलवले.त्याचबरोबर श्रीगोंदा आगार व्यवस्थापकांनीही घटनास्थळी बस दुरुस्तीबाबत सूचना केल्या. स्थानिक शिक्षक अमोल साळवे , तसेच अन्य पोलीस आणि स्थानिक प्रशासन यांची मोलाची साथ लाभली.सहलीत डॉ. राम ढगे, एसपी मखरे, संदीप दरेकर, सहल प्रमुख रत्नाकर झिटे, दिलावर पठाण, श्रीकांत थोरात, .उषा बोरूडे, परवीन शेख, प्रतीक्षा शिंदे, स्मिता क्षीरसागर, संजय डफळ, आणि अरुण जाधव हे शिक्षक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शांत राहण्याचे आणि प्रशासनावर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले.या घटनेत कोणतीही हानी झाली नाही, याबद्दल विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी प्रशासनाचे आणि पोलीस यंत्रणेचे आभार मानले आहेत. सहल यशस्वीरीत्या पूर्ण होऊन सर्व विद्यार्थी सुखरूप श्रीगोंद्यात परतले.मात्र सहलीसाठी खराब बस दिल्याने पालाकासह महाविद्यालयाने श्रीगोंदा बस आगाराच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे.




**(श्रीरामपूर : राष्ट्र सह्याद्री )** एचडीएफसी बँकेत रक्तदान शिबिर संपन्न श्रीरामपूर: येथील एचडीएफसी बँक श्रीरामपूर शाखा व अर्पण ब्लड बँक संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिरामध्ये बँक कर्मचारी ,खातेदार, युवकांनी सहभाग नोंदवला. सन २००७ पासून एचडीएफसी बँक हा उपक्रम राबवते. यावेळी ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले, त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले .एचडीएफसी बँकेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

dainik

# राष्ट्र सह्याद्री



# दुसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा भारतावर 'गुलाबी' विजय

## पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ बरोबरी

**अॅडीलेड** : भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात गुलाबी चेंडूवर खेळवल्या गेलेल्या बॉर्डर-गावसकर मालिकेतील दुसरा कसोटी सामना ऑस्र्टेलियाने तब्बल दहा गडी राखून जिंकला व पर्थ येथे पहिल्या कसोटीतत झालेल्या पराभवाचा बदला घेतला. पाच सामन्यांच्या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी झाली आहे. दुसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने गोलंदाजी, फलंदाजी व क्षेत्ररक्षण यात भारतापेक्षा सुरेख खेळ केल्याने भारताला लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवामुळे भारत वर्ल्ड ट्रस्ट चॅम्पियनशीच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानवर घसरला आहे, तर ऑस्ट्रेलियाने पुन्हा एकदा पहिले स्थान काबिज केले आहे. भारताचा दुसरा डाव अवघ्या १७५ धावात गारद झाला. जिंकण्यासाठी आवश्यक असलेल्या १९ धावा ऑस्ट्रेलियाने एकही गडी न गमवाता केल्या व भारतावर सव्वादोन दिवसात विजय मिळवला.



ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात ट्रॅव्हिस हेडने केलेल्या १४१ चेंडूतील १४० धावांच्या आक्रमक खेळीचे ऑस्ट्रेलियाच्या विजयात मोलाचे योगदान ठरले. त्याच्या व्यतिरिक्त मार्नल लाबुशेन वगळता दोन्ही संघातील एकाही फलंदाजाला अर्धशतकही करता आले नाही.पहिल्या डावात १५७ धावांनी मागे असलेल्या भारताने दुसऱ्या डावात दुसऱ्या दिवसाअखेर पाच गडी गमावले होते व २९ धावांनी मागे होता. तिसऱ्या दिवशी नाबाद असलेल्या ऋषभ पंत व नितीश रेड्डी यांनी डाव सुरू केला. हे दोघे झुंज देऊन भारताला लढण्यासाठी धावसंख्या उभी करून देतील ही अपेक्षा मिचेल स्टार्कने पहिल्याच षटकात पंतला बाद करून फोल ठरवली. पंत बाद झाल्यानंतर भारत डावाने हारतो की काय असे वाटत होते. मात्र नवोदित रेड्डीने केलेल्या ४२ धावांमुळे भारताला ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात खेळण्यासाठी बोलावण्याची संधी मिळाली. पंत बाद झाल्यार आश्विन, रेड्डी, राणा, मोहमंद सिराज यांनी पॅव्हेलियनमध्ये परतण्यासाठी जास्त वेळ गेतला नाही.

### तिसऱ्या स्थानावर घसरण

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलच्या शर्यतीत ऑस्ट्रेलिया संघ आता टॉपला आहे. यंदाच्या तिसऱ्या हंगामात १४ सामन्यातील ९ विजय, ४ पराभव आणि एका अनिर्णित सामन्यासह ऑस्ट्रेलियाच्या खात्यात १०२ गुण जमा असून त्यांच्या विजयाची टक्केवारी ही ६०.७१ टक्के अशी आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. ९ सामन्यातील ५ विजय, ३ पराभव आणि एका अनिर्णित सामन्यासह त्यांनी ६४ गुणांची कमाई केली असून या संघाच्या विजयाची टक्केवारी ही ५९.२६ टक्के एवढी आहे. भारतीय संघाने १६ सामन्यात ९ विजय, ६ पराभव आणि एका अनिर्णित सामन्यासह ११० गुण कमावले असून संघाची विजयाची टक्केवारी ५० टक्के इतकी आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**दौंड** : तालुका सध्या बिबट्याच्या दहशतीखाली आहे. काही दिवसांपूर्वीच बोरीपार्धी हद्दीत बिबट्याने सहा महिन्याच्या बाळाचा बळी घेतल्यानंतर आता तालुक्यातील कडेठाण येथे शेतात काम करणाऱ्या शेतकरी महिलेवर बिबट्यांना हल्ला करून तिला ठार केल्याची धक्कादायक घटना घडली.

लताबाई बबन धावडे (वय ५० ,रा. कडेठाण) असं बिबट्याच्या हल्यात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. ही घटना आज (दि. ७ डिसेंबर) दुपारच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण दौंड तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.दरम्यान, जी भीती शेतकऱ्यांना आणि नागरिकांना होती, ती भीती आता खरी ठरू लागली आहे. वनविभागाच्या हलगर्जीपणामुळे दौंड तालुक्यात दोघांचा निष्पाप बळी गेला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.याबाबत अधिक माहिती अशी कि, दौंड तालुक्यातील कानगाव आणि कडेठाण गावच्या शिवेवर असलेल्या कडेठाण हद्दीत शनिवारी (दि. ७) सायंकाळी चार वाजताच्या सुमारास शेतकरी धावडे यांच्या शेतात काम करणाऱ्या लताबाई धावडे यांच्यावर बिबट्याने अचानक हल्ला केला. त्यानंतर त्यांना उसाच्या शेतात फरफटत नेले. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने पुन्हा एकदा दौंड तालुक्यात खळबळ उडाली असून शेतकरी आणि ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. काही महिन्यात दौंड तालुक्यात बिबट्याने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. भीमा नदीच्या पट्ट्यात असलेल्या दौंड तालुक्यातील कानगाव, हातवळण, नानगाव, कडेठाण तर शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा, गणेगाव, सादलगाव, वडगाव रासाई या भागात बिबट्याने तांडव केले आहे. शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांची शिकार करणारा बिबट्या आता माणसाचीही दिवसाढवळ्या शिकार करू लागला आहे.

# गंगापूरमध्ये राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशन मान्यतेने छत्रपती संभाजीनगर जिल्हा टेनिसव्हॉलीबॉल असोसिएशन व भारतरत्न मदर तेरेजा इंग्लिश स्कूल गंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने २६ वी राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन दि.०६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न मदर तेरेसा इंग्लिश स्कूलच्या मैदानावर संपन्न झाले राज्य भरातून आलेल्या विविध जिल्ह्याचे खेळाडू आणि जिल्हा सचिव यांची उपस्थिती होती सदरील स्पर्धा ही प्रकाश झोतात सुसज्ज अश्या ४ क्रिडांगणावर हे सामने खेळवण्यात येणार आहे.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव प्रमोद महाजन यांनी केले तर सूत्रसंचालन अफसर शेख यांनी केले या उद्घाटन सोहळ्यासाठी टेनिस हॉलीबॉल खेळाचे जनक डॉ.व्यकटेश वांगवाड, पोलीस निरीक्षक कुमार सिंग राठोड,

फादर विल्फ्रेड सल्ढाणा,संतोष अंबिलवादे, सम्राट रियल स्टेटचे वाजीद कुरेशी, गणेश माळवे, राज्य उपाध्यक्ष डॉ.आबासाहेब शिरसाठ, नगरसेवक भागेश गंगवाल, महावीर कटारिया, प्रा.डॉ.फेरोज सय्यद, प्रा.उदय तगरे, अमीन पटेल, भागवत खाडे, नईम शेख, रामदास सारसर, मुख्तार शेख, अमर बागेस, कृष्ण डोळस, प्रसाद कुलकर्णी, अरविंद खाजेकर, गणेश झोजे, किशोर पठाडे यांची उपस्थिती होती तर स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ आबासाहेब सिरसाठ, सचिव प्रमोद महाजन, अब्दुल बागेस, आयान शेख, सालेक शेख, इमरान कुरेशी अनेकांनी विशेष परिश्रम घेत आहे.




अजितदादा पवार

यांची महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन!

बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती, जि.पुणे

ऑफीस फोन नं. ०२११२-२२२६७८, २२२३३७, २२८४०८

E-mail : apmcbaramati@rediffmail.com www. apmabaramati.com App.apmcbaramati

स्मार्ट प्रकल्प अंतर्गत केलेल्या गुणांकना मध्ये महाराष्ट्र राज्यातील ३०५ बाजार समित्यांमध्ये बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचा प्रथम क्रमांक

वैशिष्ट्ये - १) शेतमालाची उघड लिलाव पद्धतीने विक्रीची सोय व शेतमालास योग्य बाजारभाव २) इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर लिलावापुर्वी शेतमालाचे वजन व त्याच दिवशी पेमेंटची सोय ३) लायसेन्सधारक मापाड्यांकडुन संपुर्ण शेतमालाचे चोख व पारदर्शक मोजमाप ४) बारामती मुख्य यार्ड व सुपे, जळोची उपबाजार येथे ६० व ४० टनी इलेक्ट्रॉनिक भुईकाट्याची सोय ५) बारामती मुख्य यार्ड व सुपे उपबाजार येथे अत्याधुनिक यांत्रिक चाळणीची सुविधा उपलब्ध ६) शेतमाल तारण कर्ज योजना- ३% वार्षिक व्याज दराने स्वनिधीतुन कर्ज वाटप ७) ना नफा ना तोटा तत्वावर गांडुळ खत प्रकल्प विक्री दर रू. ५,०००/- ८) मुख्य यार्ड व उपबाजार येथे शेतकरी, व्यापारी व बाजार घटकांसाठी पेट्रोल पंपाची तसेच सुपे व जळोची उपबाजार येथे उछ्क्र पंपाची सोय.९) मुख्य व उपबाजार आवारात बाजार घटकांसाठी ठज फिल्टरचे शुद्ध पिण्याचे पाण्याची सोय. १०) जळोची उपबाजार येथे भव्य फळे व भाजीपाला मार्केटची उभारणी तसेच सर्व सोईनियुक्त जनावरे बाजार, शासकीय जनावरे दवाखाना तेथे एक्स-रे व ऑपरेशनची सुविधा.

श्री.अरविंद संपतराव जगताप - सचिव
श्री.निलेश भगवान लडकत - उपसभापती
श्री.सुनिल वसंतराव पवार - सभापती

संचालक मंडळ

श्री.विनायक महादेव गावडे
श्री.दयाराम सदाशिव महाडिक
सौ.प्रतिभा दिलीप परकाळे
श्री.विशाल ज्ञानदेव भोंडवे
श्री.युवराज कैलास देवकाते
श्री.नितीन शंकर सरक
श्री.बाबुराव दौलतराव कोकरे
श्री.सतीश सर्जेराव जगताप
सौ.शोभा विलास कदम
श्री.विश्वास तानाजी आटोळे
श्री.मिलिंद अशोक सालपे
श्री.प्रमोद चंद्रकांत दुरगुडे (सहा.निबंधक बारामती)
श्री.रामचंद्र शामराव खलाटे
श्री.दत्तात्रय शंकरराव तावरे
श्री.शुभम प्रताप ठोंबरे
श्री.अरुण गणपत सकट
श्री.संतोष पांडुरंग आटोळे






बारामतीचे विकासपुरुष

मा. ना. अजितदादा पवार

उपमुख्यमंत्री

पदी सलग सहाव्यांदा निवड झालेबद्दल

मनःपूर्वक अभिनंदन...!



बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्या.

बारामती. ता.बारामती,जि.पुणे.



नंदन दूध

श्री.संतोष मारुती शिंदे - व्हाईस चेअरमन

-शुभेच्छुक-

श्री. पोपटराव सोमनाथ गावडे - चेअरमन

संचालक

श्री. संदीप हनुमंतराव जगताप
श्री. सतिश हरिश्चंद्र पिसाळ
श्री. शहाजी जिजाबा गावडे
श्री. नितीन विश्वास जगताप
श्री. कौस्तुभ शरद चव्हाण
श्री. राजेंद्र दत्तात्रय रायकर
श्री. संजय रामचंद्र कोकरे
श्री. बापूराव तुकाराम गवळी
श्री. पुरूषोत्तम शिवाजी गाढवे
सौ. स्वाती मोहन खामगळ
श्री. संभाजी नारायणराव होळकर
श्री. संजय ज्ञानदेव देवकाते
श्री. संजय तुकाराम शेळके
श्री. किशोर भगवान फडतरे
सौ. शोभा गोरख जगताप
श्री. श्रीपती शंकर जाधव
श्री. प्रशांत दत्तात्रय खलाटे
श्री. दत्तात्रय सदाशिव वावगे
श्री. सुशांत महादेव जगताप
श्री. संतोष विश्वनाथ साळुंके

डॉ. योगेश वामन राणे व्यवस्थापकीय - संचालक

श्री. संजय दिनकरराव भोसले - उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा)

सर्व दूध उत्पादक, सहकारी संस्था व कर्मचारी वृंद